# तृतीय वर्ष (जनरल पेपर्स)

## कृषी अर्थशास्त्र (EG - 3)

**प्रश्न १) पुढील प्रश्नांची प्रत्येकी ८ ते १० ओळीत उत्तरे लिहा.**

**१) कृषी अर्थशास्त्राची व्याख्या सांगा.**

शेतीच्या विविध प्रश्नांच्या सर्व पैलूंचा विचार करणारी अर्थशास्त्राची उपयोजित शाखा म्हणजे कृषी अर्थशास्त्र. ही किंवा इतर कोणतीही एक व्याख्या लिहून थोडक्यात स्पष्टीकरण आवश्यक.

**२) जमीन सुधारणा म्हणजे काय?**

लहान शेतकरी आणि भूमिहीन मजूराच्या फायद्याच्या दृष्टीने जमिनीवरील मालकी हक्काचे पुनर्निधारण करणे म्हणजे जमीन सुधारणा. ही व्याख्या व तिचे स्पष्टीकरण.

**३ ) शेतमजूराची व्याख्या सांगा.**

उपजीविकेचे साधन म्हणून दुसऱ्याच्या शेतावर काम करणाऱ्या मजुराला शेतमजूर असे म्हणतात. ही व्याख्या व तिचे थोडक्यात स्पष्टीकरण.

**४) शेतीचे यांत्रिकीकरण म्हणजे काय?**

मानव आणि पशुंच्या श्रमाऐवजी शेती उत्पादनाच्या प्रक्रियेत यंत्राचा उपयोग करून शेती करणे. ही व्याख्या व तिचे थोडक्यात स्पष्टीकरण.

**प्रश्न २) पुढील प्रश्नांची २५ – ३० ओळीत उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)**

**१) कृषी अर्थशास्त्राची व्याप्ती स्पष्ट करा.**

अर्थशास्त्र आणि शेतीचा वैशिष्ट्यपूर्ण व्यवसाय या दोन्हीचा संबंध कृषी अर्थशास्त्रात येतो. या दोन विषयांच्या एकत्रिकरणातून कृषी अर्थशास्त्राच्या व्याप्तीची कल्पना येऊ शकते. शेती व्यवसायावर अनेक घटकांचा प्रभाव. त्यामुळे व्याप्ती वाढतच जाते. व्याप्ती स्पष्ट करताना उत्पादन, शेतमालाची विक्री, वितरण, वित्तपुरवठा, नियोजन या मुद्यांचा आधार घेऊन स्पष्टीकरण करावे.

**२) कृषी वित्तपुरवठ्याची वैशिष्ट्ये सांगा.**

शेती उत्पादनाच्या वैविध्यपूर्ण स्वरूपामुळे कृषी वित्तपुरवठ्याचा प्रश्न वेगळा ठरतो. औद्योगिक उत्पादनापेक्षा कृषी उत्पादनाची फारच वेगळी अशी वैशिष्ट्ये आहेत. नैसर्गिक घटक जास्त प्रभावी. म्हणून कृषी वित्तपुरवठ्याची वैशिष्ट्येही वेगळी. पुढील मुद्यांच्या आधारे वैशिष्ट्ये स्पष्ट करावीत. जोखमीचे स्वरूप, शेतकऱ्याची पत, परस्परसंबंधित उत्पादन क्रिया, धारणक्षेत्राचा छोटा आकार, खर्च आणि उत्पादनाच्या वेळेतील अंतर, वित्तपुरवठ्याचा अंदाज, अज्ञान आणि दारिद्र्य इ.

**३ ) जलसिंचनाचे महत्त्व स्पष्ट करा.**

फक्त पावसावर अवलंबून असलेली शेती निश्चित स्वरूपाचे उत्पादन देऊ शकत नाही. म्हणून कृत्रिम पाणीपुरवठ्याची सोय आवश्यक. पुढील मुद्यांच्या आधारे जलसिंचनाचे महत्त्व स्पष्ट करावे. अनियमित पाऊस, विविध पिकांची गरज, सखोल शेती, उत्पादकतेत वाढ, रोजगारात वाढ, नैसर्गिक असंतुलनावर उपाय, शेतीचे व्यापारीकरण, इतर कार्यासाठी जमिनीचा वापर इ.

**४) हरितक्रांतीतील त्रुटी स्पष्ट करा.**

हरितक्रांतीमुळे अनेक फायदे झाले. परंतु काही त्रुटी/दोषही आढळतात. पुढील मुद्यांचा आधार घेऊन त्रुटी स्पष्ट कराव्यात. भांडवली शेती पद्धतीत वाढ, शेतीतील संस्थात्मक सुधारणांकडे दूर्लक्ष, उत्पन्नातील तफावतीत वाढ, रोजगारात घट, इ.

**प्रश्न ३) टीपा लिहा. (कोणत्याही दोन)**

**१) शेती आणि उद्योग यातील फरक.**

शेती आणि उद्योग – अर्थव्यवस्थेतील दोन महत्त्वाची क्षेत्रे. दोन्ही क्षेत्रांचे कार्य परस्पर पूरक. अर्थशास्त्राची मूलभूत तत्त्वे दोन्ही क्षेत्रांना लागू मात्र दोन्ही क्षेत्रात मोठा फरक.

जमिनीचे महत्त्व, उत्पादनाचे स्वरूप, परावलंबित्व, आर्थिकेतर घटकांचा प्रभाव, नाशवंत उत्पादन, मागणीची कमी लवचिकता, खर्च आणि उत्पन्न यातील अंतर या मुद्यांच्या आधारे फरक स्पष्ट करावा.

**२) शेतीच्या व्यापारीकरणाची कारणे.**

व्यापारीकरणाचा अर्थ थोडक्यात स्पष्ट करावा. व्यापारीकरणाची कारणे पुढील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करावीत. रोख पैशाची आवश्यकता, वाहतुकीच्या साधनांत सुधारणा, व्यापाऱ्यांचे खेड्यात आगमन, सुएझ कालवा व्यापारासाठी खुला, शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा, पाणीपुरवठ्याच्या सोई, नगदी पिकांचे महत्त्व, अमेरिकेतील यादवी युद्ध, शेतकऱ्यांचा बदलता दृष्टिकोन, सरकारचे धोरण इ.

**३) मृद्संधारण.**

जमीन व तिची सुपीकता अंशतः किंवा पूर्णतः नष्ट होऊ नये म्हणून केलेले उपाय. मृद्संधारणामध्ये पुढील मुद्यांचे स्पष्टीकरण आवश्यक. वनीकरण, योग्य पिकांची लागवड, कुरणांचा योग्य वापर, पूर नियंत्रण, पट्टा पेरणी, झूम पद्धतीला प्रतिबंध, पाणलोट क्षेत्राचे शास्त्रीय नियोजन इ.

**४) अवर्षण प्रवण क्षेत्र कार्यक्रम (DPAP)**

भारतात काही भागात सतत दुष्काळ. अशा भागात रोजगार व दुष्काळाची तिव्रता कमी करण्यासाठीची योजना. उद्दिष्टे लिहावीत. या योजनेतील पुढील मुख्य घटकांचे स्पष्टीकरण द्यावे. मृद्संधारण आणि वनीकरण, पीक प्रकारातील बदल, पाण्याचा योग्य वापर, पशुसंवर्धन, दूर्बल घटकांना मदत इ.

**प्रश्न ४) भारतीय शेतीच्या अल्प उत्पादकतेची कारणे सांगा.**

भारत शेतीप्रधान देश. अर्थव्यवस्थेत शेतीक्षेत्राला महत्त्वाचे स्थान, मात्र भारतीय शेतीची उत्पादकता इतर विकसित देशांच्या तुलनेत फारच कमी आढळते. कारणे स्पष्ट करताना पुढील मुद्यांचे स्पष्टीकरण करावे.

जमीन धारणा पद्धती, धारणक्षेत्राचे लहान आकारमान, लोकसंख्या वाढीचा भार, निरक्षर शेतकरी, शेतकऱ्यांचे दारिद्र्य, भांडवलाची कमतरता, कर्जबाजारीपणा, प्रतिकूल सामाजिक वातावरण, व्यावसायिक दृष्टिकोनाचा अभाव, जुने उत्पादन तंत्र, योग्य मार्गदर्शनाचा अभाव, आधुनिक बी–बियाण्यांचा अभाव, अपूरी खते – जमीनीची धूप, रोगराई, पाणीपुरवठ्याचा अभाव, शेतमाल विक्री व्यवस्थेतील दोष, शेतीसंशोधनाकडे दूर्लक्ष, सरकारची चुकीची धोरणे इ.

**प्रश्न ५) विपणनातील कार्ये स्पष्ट करा.**

शेतीमालाचा उत्पादक व ग्राहक यांच्यात मोठे अंतर. म्हणून अनेक गोष्टींचा समावेश असलेली विपणनाची आवश्यकता निर्माण होते. शेतीमालाच्या बाबतीत विपणनाचे कार्य मूळ वस्तूच्या उत्पादनाचा काळ व स्थान यापासून सुरू होऊन अंतिम ग्राहकाच्या खरेदीजवळ थांबतात. प्रा. एफर्सन यांच्या मते विपणन कार्यात पुढील घटकांचा समावेश असतो.

मालाचे एकत्रीकरण, प्रतवारी, प्रक्रिया, दळणवळण, संग्रहण, वित्तपुरवठा, विक्री, आवेष्टन, जोखीम स्विकारणे, वितरण इ. मुद्दे विपणनातील कार्ये म्हणून स्पष्ट करावीत.

❁❁❁

## <u>भारतीय समाज (SG – 3)</u>

**प्रश्न १. पुढील प्रश्नांची प्रत्येकी ८ ते १० ओळीत उत्तरे लिहा**

**१) प्राचीन भारतातील राजकीय व्यवस्थेचे वर्णन करा.**

२) वैदिक कालापासून मध्ययुगापर्यंत, म्हणजे १२ व्या शतकापर्यंत भारतात अनेक राज्ये व साम्राज्ये झाली. राजकीय व्यवस्था – १) राजसत्ता अस्तित्वात. २) सत्तेचे विकेंद्रीकरण. ३) सैन्य व्यवस्था.

२) **शेतीच्या व्यापारीकरणाची कारणे कोणती ?**

**कारणे** - १) जमिन महसूल रोख स्वरुपात. २) व्यापारी पिकांना वाढती मागणी. ३) ब्रिटीश उद्योगांना आवश्यक अशा कच्च्या मालाची लागवड वाढविण्यास ब्रिटिशांचे उत्तेजन. ४) अमेरिकेतील यादवी युध्द.

३) **भारतातील लोकसंख्यावाढीची कारणे लिहा.**

**कारणे** - १) समशितोष्ण हवामान २) मुलीचा विवाह लवकर करण्याची प्रथा ३) रुढीपरंपरांचा पगडा ४) अज्ञान व निरक्षरता ५) लोकसंख्या नियंत्रण विषयक धोरणांमधील सरकारचे अपयश ६) मृत्यू दरात घट

४) **मुस्लिम विवाहाचे स्वरुप लिहा.**

श्री मुल्ला यांचे मत, विवाहाचे करारात्मक स्वरुप.

**प्रश्न २. पुढील प्रश्नांची २५ ते ३० ओळीत उत्तरे लिहा (कोणतेही दोन )**

१) **ब्रिटीशपूर्व भारतातील नागरी जीवन कसे होते ?**

धार्मिक क्षेत्रे, राजधान्या, बंदरे, व्यापारी केंद्रे - शहरे म्हणून विकसीत. शहरे सांस्कृतिक केंद्रे. शहरात अनेक उद्योग. कारागीर, कलावंतांचे वास्तव्य शहरात. भिन्नतेमुळे जीवनात अधिक मोकळीक. प्रवासी मोठ्या प्रमाणावर. त्यांनी आपल्या येथे भारताची वैशिष्टये नेली.

२) **भारतीय समाजातील विवाह संस्थेचे बदलते स्वरुप स्पष्ट करा.**

१) विवाहाच्या संस्कारात्मक स्वरुपात बदल. २) सगोत्र व सप्रवर विवाहबंधनात परिवर्तन. ३) बाल विवाहास विरोध ४) बहु विवाहावर बंधने ५) सतीबंदीचा कायदा व विधवा विवाहास मान्यता ६) विवाह विच्छेदनास (घटस्फोट ) मान्यता ७) विवाह जुळण्याच्या पध्दतीतील परिवर्तन.

३) **अनुसूचित जातींच्या समस्या सोडविण्यासाठी प्राथमिक पातळीवर झालेल्या प्रयत्नांची थोडक्यात माहिती द्या.**

म. फुले, वि. रा. शिंदे, छत्रपती शाहू महाराज, म. गांधी, डॉ. आंबेडकर यांसारख्या सुधारकांनी केलेले प्रयत्न.

४) **आदिवासी समाजाची प्रमुख लक्षणे लिहा.**

१) विशिष्ट भूप्रदेश २) एकाच रक्तसंबंधावर आधारित समाज ३) लोकसंख्येचे मर्यादित प्रमाण ४)वाङ्मयाचा अभाव ५) साधी तंत्रविद्या ६) साधी अर्थव्यवस्था ७) समान धर्म ८) सामाजिक एकजिनसीपणा

**प्रश्न ३. टीपा लिहा (कोणत्याही दोन )**

१) **ब्रिटीशपूर्व भारतातील स्त्रियांचे स्थान.**

प्राचीन काळातील, मध्ययुगातील स्त्रियांचे स्थान, आदिवासी स्त्रीचे स्थान, उच्च वर्गातील स्त्रियांचे स्थान.

२) **स्वातंत्र्योत्तर भारतातील धार्मिक जीवन**

१) धर्म, जातीच्या आधारावर निवडणुका २) भ्रष्टाचार व धर्मश्रध्दा यामध्ये परस्पर संबंध नाही. ३) भिन्न जातीधर्म एकत्र ४) राष्ट्रीयत्वाच्या भावनेपेक्षा धर्मभावना अधिक प्रबळ- दंगली -धर्मनिरपेक्षतेचा प्रश्न गंभीर व गुंतागुंतीचा ५) संविधानात धर्मनिरपेक्षतेचे तत्व अंतर्भूत त्याचा हेतू.

३) **राजकीय क्षेत्रातील स्त्रियांचा सहभाग**

भारतीय स्त्रीचा आर्थिक व सामाजिक दर्जा थोडयाफार प्रमाणात उंचावलेला असल्यामुळे स्त्रीचा राजकीय सहभागही वाढतो आहे. स्त्री नेतृत्व विविध प्रशासकीय व राजकीय व्यवस्थेतून पुढे येते आहे. निवडणुका, अत्यंत उच्च दर्जाची प्रशासकीय पदे, विविध चळवळी इ. मधून स्त्रिया आपली कामगिरी बजावित आहेत.

४) **दूरशिक्षण**

समाजातील दुर्बल घटक फार मोठ्या प्रमाणावर उच्च शिक्षणापासून वंचित. यावर मात करण्यासाठी दूरशिक्षण अस्तित्वात. पत्रव्यवहाराद्वारे दूरशिक्षण, मुक्त विद्यापीठ.

**प्रश्न ४. स्वातंत्र्योत्तर काळात अनुसूचित जातींच्या समस्या सोडविण्यासाठी झालेल्या प्रयत्नांचा आढावा घ्या**

**प्रास्ताविक** - स्वातंत्र्यानंतर अस्पृश्यता नष्ट करण्याचे प्रयत्न जोरात सुरु झाले. वाहतुकीची साधने वाढल्याने तसेच औद्योगिक क्रांतीमुळे विविध प्रकारचे लोक एकत्र येऊ लागले. त्यामुळे अस्पृश्यता पाळणे कठिण होऊ लागले.

**स्वातंत्र्योत्तर काळात झालेले प्रयत्न** -(अ) घटनात्मक तरतुदी (आ) विशेष सवलती आणि कल्याणकारी योजना.

**प्रश्न ५. भारतातील विविधतेस कारणीभूत घटक स्पष्ट करा.**

**प्रास्ताविक** - भारतीय समाजाचे वैशिष्ट्य म्हणजे येथे दिसून येणारी विविधता. परंतु या विविधतेबरोबरच एकताही भारतीय समाजात दिसून येते.

**विविधतेस कारणीभूत घटक** - धर्म, भाषा, प्रांत, प्रांतानुसार आचारातील विविधता, जात,आदिवासी, सर्वसामान्य जनता आणि बुध्दिजीची वर्ग यांच्यातील विभाजन.

❁❁❁

# <u>मध्ययुगीन भारत (इ.स. १२०० ते १७६५)(HG - 3)</u>

**टीप : १. उत्तरामध्ये सनावळ्यांवर भर नको.**

**२. प्रस्तावना व समारोप नमुन्यादाखल दिले असून उत्तरास अनुरूप वेगळी प्रस्तावना व समारोप लिहिल्यास त्याचे स्वागतच आहे.**

**प्रश्न १ पुढील प्रश्नांची प्रत्येकी ८ ते १० ओळीत उत्तरे लिहा.**

**१) कुतुबुद्दीन ऐबकाने स्वत:स सुलतान ही पदवी का घेतली नाही?**

प्रस्तावना - कुतुबुद्दीनचे सत्ताग्रहण.

सुलतान पदवी न घेण्याची कारणे - ऐबक गुलाम होता, त्याला आपला धनी महंमद घोरी याच्या सिंहासनावर बसण्याचा आपल्याला अधिकार नाही असे वाटत होते, प्रतिस्पर्ध्यांना तोंड देण्याचे बळ नव्हते, प्रतिस्पर्धींचा बंदोबस्त करणे आवश्यक होते, गझनीशी संबंध तोडायचे नव्हते.

समारोप - कुतुबुद्दीनचा सुभेदार या नात्याने कारभार.

**२) अल्लाउद्दीन खिलजीने सैन्याबाबत कोणत्या सुधारणा केल्या ?**

प्रस्तावना - अल्लाउद्दीन खिलजीचा अल्प परिचय.

अल्लाउद्दीनच्या सैन्यविषयक सुधारणा -

हेतू - राज्याचे रक्षण व वटहुकूमांची अंमलबजावणी

सुधारणा- खडे सैन्य, स्वतंत्र विभागाची योजना, श्रेणी, रोख वेतन, हजेरीपटाची तरतूद, घोड्यांना नंबर देण्याची व रोजच्या परेडची प्रथा.

समारोप - सदर सुधारणांचा फायदा.

**३) भक्तिचळवळीचे परिणाम लिहा.**

प्रस्तावना - भक्तिमार्गाचा उदय.

भक्तिचळवळीचे परिणाम - समाजसुधारणेला चालना, ऐक्य भावना, लोकवाङ् मयात भर, धार्मिक समन्वय, समानता.

समारोप - सुफी संप्रदायावरील भक्तिसंप्रदायाचा प्रभाव.

**४) ईस्ट इंडिया कंपनीच्या भारतातील आगमनाचा वृत्तांत लिहा.**

प्रस्तावना - ईस्ट इंडिया कंपनी कोण होती व तिच्या भारतातील आगमनाचा हेतू काय होता.

आगमनाचा वृत्तांत - कॅप्टन हॉकिन्सची मोहीम व तिचे अपयश, सर टॉमस रोची यशस्वी मोहीम.

समारोप - याच ईस्ट इंडिया कंपनीने पुढे भारतात साम्राज्य स्थापन केले.

**प्रश्न २ पुढीलपैकी दोन प्रश्नांची उत्तरे २५ ते ३० ओळीत लिहा.**

**१) फिरोज तुघलकाच्या आर्थिक सुधारणांचा आढावा घ्या.**

प्रस्तावना - फिरोज तुघलकाचा अल्प परिचय.

फिरोज तुघलकाच्या आर्थिक सुधारणा.- पाणीपुरवठ्याच्या सोई, करविषयक धोरण, बेकारी निर्मूलनाचे प्रयोग, समाजकल्याणाचे कार्य, नाण्याबाबत सुधारणा.

समारोप - मूल्यमापन.

२) **शेरशहाचे जमीन महसूलविषयक धोरण स्पष्ट करा.**

प्रस्तावना – शेरशहाचा अल्प परिचय, शेरशहापूर्व महसूल पध्दती.

शेरशहाचे महसूलविषयक धोरण – आधार – जमिनीची मोजणी, प्रतवारी, पिकाचे प्रमाण,सरकारचा हिस्सा, किंमतींचा आधार, रोख स्वरूपात वसुली, धान्याचा प्रकार, पट्टापत्र, बटाई, मुक्ताई व नगदी पध्दती.

समारोप – शेरशहाच्या महसूलविषयक धोरणाचे मूल्यमापन.

३) **औरंगजेबाच्या दक्षिण धोरणाची माहिती द्या.**

प्रस्तावना – औरंगजेबाचा अल्प परिचय.

औरंगजेबाचे दक्षिण धोरण –

पूर्वार्धातील दक्षिणेतील हालचाली – सुभेदार म्हणून, शायिस्तेखानाची स्वारी, मिर्झाराजा जयसिंगाची मोहीम, शिवाजीची आग्रा भेट, दक्षिण मोहीमहाती घेण्याची कारणे – साम्राज्यविस्तार, धार्मिक हेतू, अकबराचे बंड मोडणे.

मोहीम – आदिलशाहीशी संघर्ष व आदिलशाहीचा शेवट, गोवळकोंड्याचा विजय, मराठ्याशी संघर्ष.

समारोप – औरंगेबाचा मृत्यू व औरंगजेबाच्या दक्षिण धोरणाचे यशापयश.

४) **कृष्णदेवरायाच्या कारकिर्दीचा आढावा घ्या.**

प्रस्तावना – कृष्णदेवरायाचा अल्प परिचय व त्याचे सत्ताग्रहण.

कृष्णदेवरायाची कारकीर्द –

साम्राज्यविस्तार, प्रशासन, आर्थिक धोरण, सांस्कृतिक योगदान – शहर, मंदिरे, साहित्य.

समारोप – मूल्यमापन – विजयनगर साम्राज्याचे सुवर्णयुग.

**प्रश्न ३ कोणत्याही दोन टिपा प्रत्येकी २५ ते ३० ओळीत लिहा.**

१) **रझिया सुलताना**

प्रस्तावना – रझिया सुलताना अल्प परिचय.

सत्तास्थापना, सत्तेचे दृढीकरण – राज्यपाल, मौलवी व सैन्याच्या बंडाचे निराकरण

रझिया सुलतानाचा शेवट.

समारोप – रझिया सुलतानाची योग्यता.

२) **पानिपतची पहिली लढाई**

प्रस्तावना – पानिपतची पहिली लढाई कोणाकोणात, का व कधी झाली?

प्रत्यक्ष लढाईचे वर्णन

बाबराच्या यशाची कारणे – लढाईचे प्रगत तंत्र, बाबराचे नेतृत्व, इब्राहिमखानाच्या सैन्यातील बेशिस्त, इब्राहिमखानाची हुकूमशाही वृत्ती, इब्राहिमखानामध्ये मुत्सद्देगिरीचा अभाव.

समारोप – लढाईचे परिणाम व महत्त्व – मुघल सत्तेची स्थापना, अफगाण वंशाची सत्ता नष्ट.

३) **मनसबदारी पध्दती**

प्रस्तावना – मनसबदारी पध्दती सुरू कोणी केली? मनसबदारी म्हणजे काय?

मनसबदारी पध्दती – मनसबदारी सुरू करण्यामागील हेतू, मनसबदारी पध्दतीतील रचना, श्रेणी पध्दती

समारोप – मनसबदारी पध्दतीतील फायदे-तोटे.

४) **महंमद गवान**

प्रस्तावना – महंमद गवानाचा अल्प परिचय.

महंमद गवानाची कारकीर्द –

राज्यविस्तार, प्रशासन व्यवस्था, सांस्कृतिक योगदान, अंत.

समारोप – गवानाच्या मृत्यूनंतर बहामनी साम्राज्याचा ऱ्हास.

**प्रश्न ४ अकबराचा साम्राज्यविस्तार व राजपूत धोरण यावर टिपण लिहा.**

प्रस्तावना - अकबराचा अल्प परिचय.

अकबराचा साम्राज्यविस्तार -

राजस्थानमधील विजय - चितोड, हळदीघाटाची लढाई, वायव्य सरहद्द प्रांतातील कामगिरी, दक्षिण भारत - अहमदनगरवर हल्ला, खानदेश व बुऱ्हाणपूर जिंकले

राजपूत धोरण -कारणे - हिंदू वातावरणाचा प्रभाव, जोधाबाईबरोबर विवाह, साम्राज्य दृढ करण्यासाठी राजपूतांचा अनुनय, धोरण -राजपूतांना मानाची वागणूक, मर्यादित स्वातंत्र्य, मानाची पदे, जिझिया कर रद्द, परिणाम - राजपुतांची निष्ठा प्राप्त, राज्यविस्तारात सहभाग, संस्कृती समन्वय, धार्मिक सहिष्णुता.

समारोप - अकबराच्या साम्राज्यविस्ताराचे व राजपूत धोरणाचे मूल्यमापन.

**प्रश्न ५ मुघलकालीन आर्थिक जीवन व नागरीकरण यांची माहिती द्या.**

प्रस्तावना - मुघल साम्राज्याचा अल्प परिचय,

मुघलकालीन आर्थिक जीवन - शेती, व्यापार, उक्षेग,

नागरीकरण - व्यापारी बंदरे, हस्तोद्योग केंद्रे, राजधान्यांची गावे, धार्मिक स्थळे.

समारोप - मोगलकालीन आर्थिक भरभराटीनेच पाश्चात्त्यांना आकर्षित केले. याच काळात भारतात पाश्चात्त्यांचे आगमन झाले. व्यापारी म्हणून आलेल्या या पाश्चात्त्यांनी पुढे भारतात सत्ता काबीज केली.

❁❁❁

## आधुनिक राजकीय विचारप्रणाली (PG - 3)

**प्रश्न १) पुढील प्रश्नांची ८ ते १० ओळीत उत्तरे लिहा.**

१) **आधुनिक राष्ट्रवादाची माहिती द्या.**

**प्रस्तावना –** आधुनिक राष्ट्रवादाच्या उदयाची कारणे – अनियंत्रित राजसत्ता व जनतेची स्वातंत्र्याची मागणी – फ्रेंच राज्यक्रांती व इंग्लंडमधील लोकशाहीची उत्क्रांती यांतून निर्मिती – प्रमुख तत्त्वे

आत्यंतिक राष्ट्रवादातून साम्राज्यवाद व युद्धे. **समारोप.**

२) **टी. एच. ग्रीनने सांगितलेली 'प्रतिकार कर्तव्य' ही संकल्पना स्पष्ट करा.**

**प्रस्तावना –** व्यक्तीने राज्याच्या आज्ञांचे पालन करावे.

– एखादा कायदा व्यक्तिविकास व समाज हिताच्या विरूद्ध असल्यास त्याविरुद्ध लोकमत जागरूक करावे.

– शासनाला तो कायदा रद्द करण्यास भाग पाडणे. यासच ग्रीन 'प्रतिकार कर्तव्य' म्हणतो. **समारोप.**

३) **माओची सांस्कृतिक क्रांतीची कल्पना स्पष्ट करा.**

**प्रस्तावना –** चीनमध्ये ऑगस्ट १९६६ मध्ये सुरुवात

– 'शंभर फुले फुलू द्या' घोषणा – म्हणजेच प्रत्येकाने आपले विचार मुक्तपणे मांडावेत

– मुक्तपणे विचार मांडताना ज्यांनी माओविरूद्ध विचार मांडले त्यांना वेचून वेचून माओने त्यांचा काटा काढला. रक्तपात केला. **समारोप.**

४) **रशियातील साम्यवादाच्या पीछेहाटीची माहिती द्या.**

**प्रस्तावना –** १९८५ मध्ये गोर्बाचेव्ह यांनी 'पेरेस्त्रोईका' व 'ग्लास्तनोस्त' ही तत्त्व (पुनर्ररचना व खुलेपणा) अवलंबली.

– आतापर्यंत कम्युनिस्ट राजवटीत दबली गेलेली जनता मुक्ततेचा अनुभव घेऊ लागली व यांतूनच पुढे १९९१ मध्ये रशियाचे विघटन झाले.

– साम्यवादाची पीछेहाट – मार्क्सचा समाजवाद आणता आला नाही. **समारोप.**

**प्रश्न २) पुढील प्रश्नांची २५ ते ३० ओळींत उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)**

१) **राष्ट्रवादाचे घटक स्पष्ट करा.**

**प्रस्तावना –** राष्ट्रवादाचे घटक – वांशिक एकता, भौगोलिक सलगता, भाषिक एकता, सांस्कृतिक एकता, धार्मिक एकता, समान राजकीय आकांक्षा, आर्थिक हितसंबंधांची एकता, व्यक्तिस्वातंत्र्य, बुद्धिवाद व विज्ञाननिष्ठा. **समारोप.**

२) **जॉन लॉकचे विचार पुढील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करा.**

**प्रस्तावना –** १) राज्यसंस्थेचा उद्देश २) सत्ताविभाजन ३) कायदेमंडळाचे महत्त्व ४) अनिर्बंध सत्तेला विरोध – प्रतिकाराचा हक्क. **समारोप.**

३) **लोकशाही समाजवादाची तत्त्वे –**

**प्रस्तावना –** १) स्वार्थी व्यक्तिवादाला विरोध २) पिळवणूक करणाऱ्या भांडवलशाहीला विरोध ३) खासगी उत्पादन क्षेत्रावर नियंत्रण ४) मूलभूत हक्कांची जपणूक ५) समानतेचे तत्त्व ६) समान संधी ७) पुरेशी संधी ८) लोकशाहीचा पाया व्यापक. **समारोप.**

४) **समाजवादाच्या मर्यादा**

**प्रस्तावना –** तत्त्वज्ञान कितीही चांगले असले तरी प्रत्यक्षात लोकांना येणाऱ्या अनुभवावरून मर्यादा लक्षात येतात. १) समता आणण्याच्या नादात सत्तेचे केंद्रीकरण २) उपक्रमशीलता व कार्यक्षमतेचा प्रोत्साहन न मिळाल्याने ऱ्हास ३) नोकरशाहीवर अवलंबन वाढते ४) भ्रष्टाचार, दिरंगाई. **समारोप.**

**प्रश्न ३) टिपा लिहा (२५ ते ३० ओळी) (कोणत्याही दोन)**

१) **जे. एस मिलचे स्वातंत्र्याबाबतचे विचार**

**प्रस्तावना –** स्वातंत्र्याची आवश्यकता – स्वातंत्र्याचा अर्थ व प्रकार
स्वातंत्र्यावर आघात करणाऱ्या बाबी. **समारोप.**

२) **लेनिनचा क्रांतीचा सिद्धान्त**

**प्रस्तावना –** हिंसेची अपरिहार्यता – क्रांतीकरिता ४ आवश्यक बाबी
१) मार्क्सवादी उद्दिष्टे समोर असलेला सतत जागरूक क्रांतीवादी गट २) शिस्तबद्ध पक्ष ३) योग्य नेतृत्व ४) जनतेतील सक्रीय असंतोष. **समारोप.**

३) **उपयुक्ततावाद**

**प्रस्तावना –** जेरेमी बेन्थॅम हा उद्गाता. सुखाचा संख्यात्मक विचार – १) सुखाची तीव्रता २) निश्चितता ३) कायमर्यादा ४) उपलब्धता ५) शुद्धता ६) व्यापकता हे घटक.
कायदे करताना अधिकतम लोकांचे अधिकतम सुख पहावे. मिलने यांत भर घातली.
१) गुणात्मक फरक २) मोजमाप कठीण ३) नैतिकतेवर भर ४) सामाजिक आशय. **समारोप.**

४) **फॅसिझमची वैशिष्ट्ये**

**प्रस्तावना –** १) हिंसेवर भर २) राज्य सर्वश्रेष्ठ ३) लोकशाही विरोध ४) साम्यवादाला विरोध ५) बुद्धिविरोधी तत्त्वज्ञान ६) साम्राज्यवादाचा पुरस्कार ७) सत्तेच्या केंद्रीकरणावर भर ८) संघप्रधान राज्य. **समारोप.**

**प्रश्न ४) राष्ट्रवादाची व्याख्या सांगून हिंदू राष्ट्रवादावर टिपण लिहा.**

**प्रस्तावना –** राष्ट्रवादाची व्याख्या – १) लास्की २) मिल
हिंदू राष्ट्रवाद – ब्रिटिश विरोधांतून निर्मिती
२ मुख्य प्रवाह – १) प्राचीन हिंदू संस्कृती, धर्म यांतील महत्त्व लोकांना पटवणे २) हिंदू संस्कृतीचे पुनरूज्जीवन
पुनरूज्जीवनवाद व सुधारणावाद – यांसाठी संस्थांची स्थापना – १९०७ हिंदू महासभा – १९२७ राष्ट्रीय स्वयंसेवक संघ
स्वामी विवेकानंद, महर्षी दयानंद, पं. मदन मोहन मालवीय, भाई परमानंद.
हिंदू राष्ट्रवादाची ठळक तत्त्वे –
मूल्यमापन. **समारोप.**

**प्रश्न ५) कार्ल मार्क्सचा ऐतिहासिक भौतिकवादाचा सिद्धान्त सांगून मार्क्सच्या विचारांचे मूल्यमापन करा.**

**प्रस्तावना –** द्वंद्वात्मक भौतिकवाद – वर्गसंघर्ष

मानवी प्रगतीचे टप्पे

१) प्राचीन साम्यवाद २) गुलामगिरी अवस्था ३) सरंजामशाही ४) भांडवलशाही ५) श्रमिकांची हुकूमशाही ६) साम्यवाद

मूल्यमापन. **समारोप.**

❁❁❁

# पर्यटन भूगोल – (GG – 3)

**प्रश्न १. पुढील प्रश्नांची उत्तरे ८ ते १० ओळीत लिहा.**

१) **पर्यटनामध्ये वाहतूक साधनाचे महत्त्व लिहा.**

पर्यटन व वाहतूक जवळचा संबंध, प्राचीन काळी प्रवासी साधने, आजच्या काळातील वाहतूक साधने – रस्ते, हवाई, सागरी या साधनांची थोडक्यात माहिती लिहिणे आवश्यक.

२) **पर्यटन भूगोलाचे महत्त्व लिहा.**

नवनवीन पर्यटन स्थळांची माहिती, स्थलवैशिष्ट्ये व निसर्ग सौंदर्य असणारी ठिकाणे पर्यटकांना माहिती करून देणे, पर्यटन स्थळांचा विकास, सामाजिक मूल्यांची कदर, इत्यादी मुद्द्यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक.

३) **पर्यटन व नैसर्गिक वनस्पती यांचा सहसंबंध स्पष्ट करा.**

नैसर्गिक वनस्पती पर्यटन विकासातील महत्त्वाचा घटक, पर्यटकांमुळे नैसर्गिक वनस्पतीचे फायदे व तोटे लिहिणे आवश्यक.

४) **पर्यटन बाजारपेठेची वैशिष्ट्ये लिहा.**

पर्यटन हे अस्पर्शी वस्तू उत्पादक, उत्पादक व उपयोग यातील पर्यटन सेवेचे संबंध, मध्यस्थाची प्रभावी भूमिका, बाजारपेठेची अस्थिरता, इत्यादी मुद्द्यांचे स्पष्टीकरण.

**प्रश्न २ रा पुढील प्रश्नांची उत्तरे २५ ते ३० ओळीत लिहा. (कोणतेही दोन)**

१) **पर्यटन भूगोलाची व्याप्ती स्पष्ट करा.**

**प्रस्तावना –** पर्यटन भूगोलाची व्याख्या.

मुद्दे – पर्यावरणाची माहिती व जिज्ञासा, लोकांचा संपर्क वाढतो, पर्यटनामध्ये आधुनिकता, पर्यटनाची प्रगती, नवनवीन शोध, इतर देशांशी संपर्क, रोजगार निर्मिती इत्यादी मुद्द्यांचे उदाहरणासह स्पष्टीकरण करणे आवश्यक. **समारोप.**

२) **पर्यटन व्यवसायाच्या विकासामुळे निर्माण होणाऱ्या समस्या स्पष्ट करा.**

**प्रस्तावना** – पर्यटन हा एक आर्थिक व्यवसाय आहे.

मुद्दे – पर्यटन व भूमीउपयोजन, पर्यटन व भूमिउपयोजनाची दुसरी समस्या, प्रदूषणात वाढ, देशांतर्गत पर्यटनात घट इत्यादी मुद्द्यांचे सविस्तर व उदाहरणासह स्पष्टीकरण करणे आवश्यक. **समारोप.**

३) **पर्यटनामध्ये हवाई वाहतुकीचे महत्त्व स्पष्ट करा.**

**प्रस्तावना** – दीर्घकाळ अंतरावरील व खंडीत प्रवासासाठी हवाई वाहतुकीस पर्याय नाही. सर्वात जलद पण महागडा वाहतूक मार्ग.

मुद्दे – दीर्घकाळ अंतरासाठी गतिमान, मौल्यवान वस्तुसाठी सोयीस्कर, मर्यादीत जागा, कमी वजनाच्या मालासाठी, खर्चिक, यांत्रिक व्यवस्था, इंधन जास्त, उच्च राहणीमानी लोकांसाठी इत्यादी मुद्द्यांचे सविस्तर स्पष्टीकरण करणे आवश्यक. **समारोप.**

४) **'गोवा' ह्या पर्यटन राज्याविषयी माहिती लिहा.**

**प्रस्तावना –** निसर्गरम्य ठिकाणी निसर्गाच्या सौंदर्याचा आस्वाद घेण्याकरता जास्तीत जास्त संख्येत पर्यटक येत असतात.

मुद्दे – हवामान, मृदा व वनस्पती, ऐतिहासिक पार्श्वभूमी, समुद्र किनारे, धार्मिक स्थळे, निवास व्यवस्था, वाहतूक व्यवस्था इत्यादी मुद्द्यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक. **समारोप.**

**प्रश्न ३ टीपा लिहा (कोणतेही दोन)**

**१) पर्यटनाचे स्वरूप**

**प्रस्तावना** – पर्यटन हा एक महत्त्वाचा व्यवसाय आहे. आधुनिक पर्यटन व्यवसायाच्या वाटचालीमध्ये परिवर्तन घडवून आल्यामुळे पर्यटनाचे स्वरूप बदलून गेले आहे.

मुद्दे – वैशिष्ट्यपूर्ण, विविधता, मनोरंजकता, गतीशील व स्थिर, अनुउत्पादकता, कालिकता, ऐतिहासिकता, भौगोलिकता, सांस्कृतिक व धार्मिक इत्यादी मुद्द्यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक. **समारोप.**

**२) पर्यटन व पर्यावरणाचे प्रदूषण**

**प्रस्तावना** – पर्यावरणीय प्रदूषण व पर्यटन यांचा जवळचा संबंध आहे. वास्तविक पर्यावरण प्रदूषण ही एक जागतिक गंभीर समस्या बनलेली आहे.

मुद्दे – पुळणीचे प्रदूषण, जलप्रदूषण व ध्वनी प्रदूषण या मुद्द्यांचे उदाहरणासह स्पष्टीकरण करणे आवश्यक. **समारोप**.

**३) पर्यटन विकास**

**प्रस्तावना** – पर्यटन हा जगातील विकसीत व महत्त्वाचा व्यवसाय आहे.

मुद्दे – पूर्वीची व आधुनिक काळातील वाहतूक व्यवस्था - रस्ते, रेल्वे, हवाई, सागरी, आर्थिक विकास, सांस्कृतिक विकास व सामाजिक विकास इत्यादी मुद्द्यांचे उदाहरणासहित स्पष्टीकरण करणे आवश्यक. **समारोप.**

**४) भारतातील ऐतिहासिक पर्यटन स्थळ – दिल्ली.**

**प्रस्तावना** – भारत हा एक ऐतिहासिक देश आहे.

मुद्दे – भारताची राजधानी, जूना इतिहास, ऐतिहासिक ठिकाणे, जून्या वास्तु, वस्तू संग्रहालय, इत्यादी मुद्द्यांचे सविस्तर स्पष्टीकरण करणे आवश्यक. **समारोप.**

**प्रश्न ४ पर्यटनाचे आर्थिक घटकांवर होणारे परिणाम स्पष्ट करा.**

**प्रस्तावना –** पर्यटनाचे उत्पन्न म्हणजे पर्यटकांना वस्तू व सेवा इत्यादी खर्चाचा समावेश होतो, तर पर्यटनाचे उत्पन्न म्हणजे पर्यटकांना वस्तू व सेवा पुरवून मिळवलेले उत्पन्न होय.

**मुद्दे –** आर्थिक विकासाला सहाय्य, परकीय चलन, राष्ट्रीय उत्पन्नात वाढ, सरकारला मिळणारा महसूल, देवघेवाची समतोल, स्थानिक अर्थव्यवस्थेला मदत, पर्यटन आणि उत्पन्न, पर्यटन आणि इतर उद्योगांचा विकास, पर्यटन व प्रादेशिक विकास, पर्यटन व रोजगार, पर्यटन व गुंतवणूक या मुद्द्यांचे उदाहरणासहित स्पष्टीकरण करणे आवश्यक.

**समारोप –** पर्यटकांना होणारा केवळ खर्च नव्हे तर वरीलप्रमाणे अनेक अप्रत्यक्ष व उत्पन्न यांचा अर्थव्यवस्थेवर परिणाम होतो.

**प्रश्न ५ पर्यटन बाजारपेठेची कार्य उदाहरणासहित स्पष्ट करा.**

**प्रस्तावना –** पर्यटन बाजारपेठेचा दृष्टिकोन इतर उद्योगातील बाजारपेठेपेक्षा वेगळा असतो.

**मुद्दे –** बाजारपेठ संशोधन – प्रयोगशाळेतील संशोधन क्षेत्र, संशोधन, नमुना सर्वेक्षण, प्रेरण संशोधन, जाहिरात विक्री सहाय्य – माहितीपत्रके, दुमडलेली पत्रिका, विक्री पत्रे, वितरण साहित्य, जनसंपर्क, पर्यटन प्रसिद्धी इत्यादी मुद्द्यांचे सविस्तर स्पष्टीकरण करणे आवश्यक.

**समारोप –** पर्यटकांच्या गरजा माहित करून घेणे आणि त्या पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करणे, याद्वारे बाजारपेठेची नवीन ग्राहकनिर्मितीस मदत होते.

❁❁❁

## मराठी (MG – III) अभ्यासक्रम

१) कमला – ले. विजय तेंडुलकर

२) विद्रोही कविता – संपा. केशव मेश्राम

३) जरा जाऊन येतो – ले. दि. बा मोकाशी

**विद्रोही कविता – संपा. केशव मेश्राम.**

१. नाही लढल्याविण मुक्ती

४. आता

७. पाथरवट

१०. ह्या मोसमात

११. एका नव्या संघर्षात

१४. एक दिवस मी परमेश्वराला

१६. जपून ठेवले आहे

१९. येथला प्रत्येक हंगाम

२५. तुम्ही प्रकाशाचे पुंजके व्हा!

२९. लोकशाहीचा फुलोरा

३१. माणूस

३३. मी निराश नाही रे!

३५. उधाणलोय

३९. वैरी

४१. चित्रे

४२. मला जगायचंय

४८. जंगलाच्या नव्या आलेखाबद्दल

५०. शिकार होऊ नये म्हणून

५४. संभावित सूर्यासारखे

५६. बरे झाले नसते

६०. सखी

६२. ठेवा

६४. निघाले हे चक्र

६७. अनामिकास

६८. रस्ते

६९. उन्हातलं झाड

७०. सबक

७३. मी स्वीकारतो

७४. मु. पो. केसलागुडा

**जरा जाऊन येतो – दि. बा. मोकाशी**

२. रोमच्या सुताराची गोष्ट

३. काय रानटी लोक आहेत!

५. वणवा

६. आता आमोद सुनासि आले

७. लेणी

१०. अघोर

१४.	आम्हाला काय कमी

१५.	पुण्याची मुलगी

१८.	जरा जाऊन येतो

१९.	अनुनय

## मराठी (MG – 3)

**गृहपाठ – १**

**प्रश्न – एक यशस्वी नाटक म्हणून विजय तेंडुलकरांच्या 'कमला' या नाटकाची चर्चा करा.**

प्रस्तावना – तेंडुलकरांचा परिचय – लेखनशैलीची वैशिष्ट्ये – सामाजिक विषय – ज्वलंत प्रश्न – समाजातील रूढी विरुद्ध विषय – ज्वलंत सामाजिक विषयाची मांडणी – बायकांचा बाजार – त्या बाजारातून कमलाला विकत आणणे – याचा जयसिंगने पत्रकारितेतील राजकारणाशी संबंध जोडणे – सरिताला न पटणे – यावर काकासाहेबांची भूमिका – कमलाचे व्यक्तिमत्त्व – तिचे विचार – सरिताचे विचार परिवर्तन – समाज विरोधी निर्णयावर जयसिंगचा तोडगा – सरिताची प्रतिक्रिया – समारोप.

**गृहपाठ – २**

**प्रश्न – 'दि. बा. मोकाशींचे अनुभव विश्व प्रामुख्याने मध्यमवर्गीय अनुभवांशी निगडीत आहे'. या विधानाची चर्चा करा.**

प्रस्तावना – लेखकाचा परिचय – कथालेखन सहज, सुलभ, मध्यम वर्गाशी निगडीत – कथेतील व्यक्ती मध्यवर्गीय, चालणे, बोलणे, संस्कार – वागणे – धारणा – साहजिकच अनुभवही मध्यमवर्गीय समाजाशी निगडीत – भव्यदिव्य – राजे – उद्योगपती – नेते अशी पात्रे नाहीत – कथेची उदाहरणे – जरा जाऊन येतो – काय रानटी लोक आहेत अशा स्वरूपाच्या कथा त्यातील पात्रे - समारोप.

**गृहपाठ ३ रा**

**प्रश्न – दि. बा. मोकाशी यांची कथाशैली स्पष्ट करून थोडक्यात उदाहरणे द्या.**

प्रस्तावना – लेखकाचा परिचय – लेखनशैलीची वैशिष्ट्ये – कथाविश्व प्रामुख्याने मध्यमवर्गीय अनुभवांशी निगडीत – कोटुंबिक अनुभवांवर भर – वेगवेगळ्या वयातील – वेगवेगळ्या वातावरणातील स्त्री – पुरुषांचे प्रेमानुभव – भाषा शैली ओघवती – कथेची लेखन शैली - कमीत कमी शब्दात अर्थपूर्ण शब्दरचना – संवादात्मक व वर्णनात्मक पद्धती – उदाहरणार्थ – वणवा, 'आता आमोद सुनासि आले' रोमच्या सुताराची गोष्ट – पुण्याची मुलगी – जरा जाऊन येतो - अनुनय इ. कथा – समारोप.

**गृहपाठ ४ था**

**प्रश्न – 'इमारत जुनाट झाली' असे म्हणण्यातून कवी अमरशेख यांना काय सुचवायचे आहे?**

प्रस्तावना – कविचा परिचय – 'पाथरवट' या कवितेतून 'इमारत जुनाट झाली' अशी प्रतिमा वापरली आहे – जुनाट रूढी – परंपरा – समाज व्यवस्था जुनाट झालेली मोडून काढून नवीन परंपरांचा इशारा – गरज – नवे मानवतेचे मंदीर बांधा – त्याकरिता लोकशक्ती एकत्र आणण्याची गरज – असे कवी सुचवतो – समारोप.

**गृहपाठ ५ वा**

**प्रश्न – विद्रोही कविता या काव्यसंग्रहातून विद्रोही भावनेचा तीव्र प्रत्यय येतो – या विधानाची साधकबाधक चर्चा करा.**

प्रस्तावना – कविंचा परिचय – कविता हा उत्कट भावाविष्कार – विद्रोही कवितांच्या संपादनात केशव मेश्राम यांनी केलेली कवितांची निवड – विद्रोह – संघर्ष – दलितकवितेचे वेगळेपण – केवळ दुःखाची, अन्यायाची गाऱ्हाणी नाहीत – परिस्थिती बदलण्यासाठी प्रयत्नशील – जुनाट रूढी व परंपरा यावर ताशेरे – सामाजिक व आर्थिक शोषण यांची जाणीव – दलित – पिडीत समाजातील व श्रमिक वर्गातील लोकांच्या जीवनातील प्रश्न – त्यामुळे विद्रोही भावनेचा प्रत्यय – समारोप.

**English (ENG – III) Syllabus**

**TEXT:-**

1) **Wings of Fire (A.P.J. Abdul Kalam)**
2) **Fantasy (A collection of short stories - Edited - by - V. Sasikumar)**
3) **All four Grammar books (TMV)**

**PROSE -** Textual and Non textual

* Textual Comprehension

a) Reference to context

b) Answer in brief

c) Short Notes

* Non-textual Comprehension

**GRAMMAR**

1) Accuracy of expression
   i. Use of Passive Voice
   ii. Use of Indirect Narration
2) Analysis of Simple, Complex and Compound Sentence
3) Revision of All Tenses
4) Use of not only but also, although, As well as, so - that, Question tag, remove too
5) Finding the word with the required shade of meaning with the help of treasures.

**TRANSLATION**

English into Marathi/Hindi

**WRITING**

1) Letter writing - Complaint/Application
2) Summary writing
3) Paragraph writing
4) Conversation writing (given topics)
5) Expansion of ideas

**Subject: English (Eng - III)**
**Text – 1) Wings of Fire – APJ Abdul Kalam**
**2) Fantasy a collection of short stories – Ed. by V. Sasikumar**
**Note: All Questions are Compulsory.**

## Home Assignment No - 1

**Q.1 Explain the following sentences giving reference to their context in about 10-12 lines. (any two). (5)**

1) "A big shot is to a little shot who keeps on shooting, so keep trying!"
2) "Arun made money by fits and starts"
3) "This flying machine has been constructed by engineers of ability."
4) "I hope you don't mind the open window."

**Q.2 Answer in brief. (any two) (5)**

1) What was important lesson that Iyaduri Solomon taught the author?
2) What, according to the " Kalam" , does one need to be a successful team leader?
3) Attempt a brief character sketch of Schatz.
4) What kind of a person was the new Vicar?

**Q.3 Write Short Notes. (any two) (5)**

1) Story of Sher Singh
2) Guddavva's Skill as a story teller
3) Von Braun's achievements
4) Setbacks in the successful launch of Agni

**Q.4 Do as Directed. (any one) (1)**

1) I want tea. I want coffee. (Use either. or)
2) He was too short to travel alone. (Remove "too")

## Home Assignment No - 2

**Q.1 Explain the following sentences giving reference to their context in about 10-12 lines. (any two). (5)**

1) " I wish you could see the drawing room , Joe and the rugs."
2) "You are not going to die. What's the matter with you?"
3) "Going away is a part of growing up. Our love will not bind you nor will our needs hold you"
4) "My job is to make decisions; but it is equally important to see that these decisions are accepted by my team members"

**Q.2 Answer in brief. (any two) (5)**

1) Why was the Nandi project abandoned?
2) Why was Vnaemeka optimistic?
3) Describe Guddava's skill as a story teller.
4) What happened at the launch of SLV-3 on 10 August 1999? How did the author react?

**Q.3 Write Short Notes (any two) (5)**

1) Character of Arun
2) Sher Singh as Bahadur
3) Character of Vera
4) Situation at INCOSPR in the early sixties.

**Q.4 Do as Directed. (any one) (1)**

1) No other king was as great as Shivaji. (Change the degree)
2) They looked young and strong also. (Use not only but also)

## Home Assignment No - 3

**Q.1 Read the following passage carefully and answer the questions that follow. (10)**

Most of us, when we grow up and have our own families to look after, have only a limited amount of spending money. Food should definitely be a priority in our budget. Saving, which involves cutting down on food is a false economy. A rough plan of the meals for the week and shopping lists are of great help to the housewife or indeed, to anyone catering for themselves or a family.

Shopping is much easier and more economical if the meals have been roughly planned in advance and we buy only what we have listed. This means resisting the temptation to buy things we do not really need. Modern advertising and packaging have sometimes made foods attractive which do not do us much good. We tend to buy innutritious food items many times because of this. When choosing food, the shopper needs to turn a blind eye to the bright labels and have a good luck at the nutritive value of the contents.

Planning meals is not difficult if we simply remember to include some body-building, heat and protective foods in each meal. This will give us a balanced diet. It is better to eat the protein and vitamin foods first when we are most hungry and fill up with the starch and sugar foods after. Too much starch and sugar and not enough protein would make the diet unbalanced.

**<u>Questions</u>**

1) What makes shopping easy? **(1)**
2) What is the influence of modern advertising on our choice of food? **(1)**
3) What, according to the writer, does a balanced diet include? **(1)**
4) What does the writer have to say about budgeting on food? Is it possible to economize on food? Is it a right thing to do? **(2)**
5) What should be done by the shopper in order to avoid the temptation of buying something that is not really needed? **(2)**
6) Write the meanings of the following expressions. **(3)**
   a) Priority
   b) Budget
   c) Meal

**Q.2 Clause Analysis (Write down principal and subordinate clause separately)(Any two) (5)**

1) She said she was innocent.
2) The car in which I was travelling was made in Japan.
3) God made the country and man made the town.

**Q.3 Do as Directed. (any one) (1)**

1) Rakesh is tall and handsome. (Use "not only but also")
2) I want tea. I want soup. (Use either, or)

## Home Assignment No - 4

**Q.1 Change the Voice. (Any Four) (4)**

1) The old man is singing a song.
2) The matter will be discussed by us.
3) Ganesh is solving sums.
4) Yogesh is played football.
5) She reads books.

**Q.2 Turn the following sentences into indirect speech. (Any Four) (4)**

1) Ketan said to Leela, "I am your brother"
2) "Mom!" he shouted "Where are you?"
3) Reena said to Leena, "May I come with you?"
4) She said to me, "I will definitely come with you tomorrow."
5) Sameer says to me, "I always tell the truth"

**Q.3 Do as Directed. (Any Four) (4)**

1) I had ---------------- sandwich and -------------- apple. (Use appropriate article)
2) Keep a dictionary --------------------- you when you are studying English. (Use appropriate preposition)
3) Our function will begin with the ----------- of Lord Ganesha. (Use appropriate form of the word 'Pray')
4) The old man is singing a song. (Change the voice)
5) Ameya plays cricket. (Convert it into Simple Past tense)

**Q.4 Translate the following passage into Marathi or Hindi. (4)**

I was born into a middle - class Tamil family, in the island town of Rameshwaram. It was 1931, and Rameshwaram was a part of Madras State, in British India. I was one of many children – a short boy with rather ordinary looks, born to tall and handsome parents.

## Home Assignment No 5

**Q.1 Letter Writing. (Any One) (4)**

1) Write an application letter for the post of "Accountant" in Shahu College, Kolhapur.
2) Write a complaint to the commissioner of police about the nuisance caused by Loud speakers in your area.

**Q.2 Conversations (More than 15 lines) (4)**

1) Write a conversation between Seema and booking clerk at the railway station as Seema wishes to go to Chennai.
2) Write a conversation between you and your friend on the football match which you saw yesterday.

**Q.3 Read the following passage carefully and write down the summary of one third in length. (4)**

It is true that chance plays a great part in human life. We many times see that our plans fail. But we should not feel that it is because of our destiny. Destiny is an excuse for idle persons. We should remember that every man is gifted with a no. of qualities. If he makes use of these qualities there is every possibility that he will be successful. But if he keeps on blaming his fate he will never try to make use of his wonderful qualities and he may have to face a failure. Remember always that, man is the architect of his own fortune.

**Q.4 Write a paragraph on of the following. (Any One) (4)**

1) My Favorite Book
2) My Ambition

# मराठी (MG – III) प्रश्नपेढी

**कमला**

१. ‘कमला’ या नाटकातील प्रमुख पात्रांचा थोडक्यात परिचय करून द्या.
२. ‘कमलाच्या’ येण्यामुळे सरिताच्या भावविश्वात कोणती खळबळ निर्माण होते? का?
३. ‘कमला’ या नाटकाचा शेवट तुम्हास पटतो काय? कारणासहित स्पष्ट करा.
४. ‘सरिता आणि जयदेव यांच्यात ‘कमला’ च्या निमित्ताने अंतर निर्माण होते. ’ – या विधानाची चर्चा करा.
५. वर्तमानपत्रातील विश्वाचे कोणते दर्शन ‘कमला’ नाटकातून घडते?
६. काकासाहेब आणि जयसिंग – या दोघांच्या पत्रकारितेत फरक आहे का? कोणता?
७. जयसिंगची ‘कमला प्रकरणा’ तील भूमिका कोणती आहे?
८. ‘कमला’ नाटकाच्या आधारे तेंडुलकरांच्या संवादलेखनाची कोणती वैशिष्ट्ये दिसून येतात?
९. टिपा द्या.
   अ) सरिता
   ब) जयसिंग
   क) काकासाहेब
   ड) कमला
   इ) नाटकातील दुय्यम व्यक्तिरेखा
   फ) नाटकातून निर्माण होणारे प्रश्न

**जरा जाऊन येतो.**

१. दि. बा. मोकाशी यांच्या ‘जरा जाऊन येतो’ या कथासंग्रहातील तीन कथांची आशयसूत्रे स्पष्ट करा.
२. ‘मोकाशींचे कथाविश्व प्रामुख्याने मध्यमवर्गीय अनुभवांशी निगडीत आहे.’ या विधानाची चर्चा करा.
३. मोकाशींच्या कथेतील प्रेमानुभवाचे चित्रण कसे आहे? कथांच्या आधारे स्पष्ट करा.
४. ‘मोकाशींच्या कथा त्यांचा चिंतनशीलतेचा प्रत्यय देतात’ – या विधानाची चर्चा करा.
५. मोकाशींच्या कथेची वाङ्मयीन वैशिष्ट्ये ‘जरा जाऊन येतो’ या कथासंग्रहाच्या आधारे स्पष्ट करा.
६. टिपा लिहा.
   अ) रामजी (आता आमोद सुनासि आले)
   ब) ‘पुण्याची मुलगी’ या कथेतील विनोद
   क) ‘वास्तु’ या कथेतील अनुभव
   ड) ‘वणवा’ या कथेच्या शीर्षकाची समर्पकता
   इ) ‘जरा जाऊन येतो’ मधील अनुभव

**विद्रोही कविता**

१. ‘विद्रोही कविता’ या काव्यसंग्रहातून विद्रोही भावनेचा तीव्र प्रत्यय येतो. – या विधानाचा परामर्श घ्या.
२. दलितांनी कोणत्या प्रकारचा लढा दिला पाहिजे असे कवींना वाटते? कशासाठी?
३. ‘इमारत जुनाट झाली’ असे म्हणण्यातून कवी अमरशेख यांना काय सुचवायचे आहे?
४. ‘विद्रोही कविता या संग्रहातून विविध कवींची वेदना व दुःखे बोलकी झाली आहेत’ – या विधानाची चर्चा करा.
५. ‘तुम्ही प्रकाशाचे पुंजके व्हा’ असे कवी का सांगतात? त्यामधून त्यांना काय सुचवायचे आहे?
६. ‘मी निराश नाही रे’ या अर्जुन डांगळे यांच्या कवितेतून कोणता आशावाद प्रकटतो?
७. ‘उधाणलोय’ या कवितेतून कवीची लढाऊ वृत्ती कशी प्रकटली आहे?
८. ‘वैरी’ या कवितेतून कवींची बंडखोर वृत्ती कशी प्रकटते?
९. ‘विद्रोही कविता’ या संग्रहातील कवितांतून उपरोध कसा प्रकटतो ते सोदाहरण लिहा.
१०. टिपा लिहा.
   १) ‘विद्रोही कविता’ संग्रहातील सूर्य प्रतिमा
   २) दलित कवींचा संघर्ष
   ३) दलित कवींची वेदना

**संदर्भासह स्पष्ट करा.**

| | | |
|---|---|---|
| १) | 'नाही लढल्याविण मुक्ती' | (कविता – १) |
| २) | 'मानवतेचे नवीन मंदीर येथे बांधा या जागेवर' | (कविता – ७) |
| ३) | 'बरे झाले नसते' | (कविता – ५६) |
| ४) | 'यात माझा काय दोष हे मला सांगशील का?' | (कविता – ६०) |
| ५) | 'राणी, प्रकाशयुगाचा ठेवा माझ्या डोळ्यांत' | (कविता – ६२) |
| ६) | 'इथे भीक मागून काहीच मिळत नसते' | (कविता – ६७) |

❁❁❁

# तृतीय वर्ष (स्पेशल विषय)
# (अर्थशास्त्र)
# (ECONOMICS)

## समग्रलक्षी अर्थशास्त्र (ES-3)

**प्रश्न १) पुढील प्रश्नांची प्रत्येकी ८ ते १० ओळीत उत्तरे लिहा.**

**१) राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे काय?**

विशिष्ट मुदतीत उत्पन्न केल्या जाणाऱ्या वस्तू आणि सेवांचे दोन वेळा मोजमाप न करता केली जाणारी मोजणी म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न होय. ही व्याख्या व तिचे थोडक्यात स्पष्टीकरण.

**२) वित्तीय धोरण म्हणजे काय?**

राष्ट्रीय उत्पन्न, उत्पादन आणि रोजगार यावर मोठा परिणाम घडवून आणणे व अयोग्य परिणाम टाळणे यासाठी सरकारी उत्पन्न व खर्चविषयक कार्यक्रमांचा वापर करणारे धोरण म्हणजे वित्तीय धोरण होय. या बाबतचे थोडक्यात स्पष्टीकरण.

**३) बँकेची व्याख्या सांगा.**

बँक म्हणजे आदेशपत्राच्या (चेक) साहाय्याने आणि मागणी केली असता परत देण्याच्या अटींवर ठेवी स्विकारणारी व्यक्ती अथवा संस्था होय. ही व्याख्या व थोडक्यात स्पष्टीकरण.

**४) आंतरराष्ट्रीय व्यापार म्हणजे काय?**

आंतरराष्ट्रीय व्यापार म्हणजे निरनिराळी राष्ट्रे एकमेकांशी करत असलेला व्यापार होय. ही व्याख्या उदाहरणासह स्पष्ट करावी.

**प्रश्न २) पुढील प्रश्नांची २५ – ३० ओळीत उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)**

**१) राष्ट्रीय उत्पन्न मोजण्याच्या पद्धती सांगा.**

राष्ट्रीय उत्पन्नाची व्याख्या सांगून उत्पादन, उत्पन्न व खर्च या तीन पद्धती स्पष्ट करणे आवश्यक. उदाहरण देऊन पद्धतीमध्ये येणाऱ्या अडचणी स्पष्ट करणे.

**२) उत्पन्नाच्या वर्तूळाकार प्रवाहाची संकल्पना स्पष्ट करा.**

अर्थव्यवस्थेत विविध विभाग उत्पादन कार्यात सहभागी असतात. या सर्व विभागाच्या परस्परावलंबित्वामधून अर्थव्यवस्थेत उत्पन्नाचा वर्तूळाकार प्रवाह निर्माण होतो. एकाचे उत्पन्न हा दुसऱ्याचा खर्च असतो. कुटुंब संस्था व उत्पादन संस्था यांच्यातील उत्पन्नाचा प्रवाह आकृतिसह स्पष्ट करणे आवश्यक.

**३) केन्सच्या मते गुंतवणूक कोणत्या घटकांवर अवलंबून असते?**

केन्स यांनी भांडवलाची सीमांत कार्यक्षमता व व्याजदर या दोन घटकांवर गुंतवणूक अवलंबून असते असे स्पष्ट केले आहे. हे मुद्दे सविस्तर स्पष्ट करणे आवश्यक.

४) **बचतीचे प्रमाण कोणत्या घटकांवर अवलंबून असते?**

बचतीची व्याख्या व थोडक्यात स्पष्टीकरण. बचतीचे प्रमाण पुढील घटकांवर अवलंबून असते. उत्पन्न, उत्पन्नाचे वाटप, व्याजदर, भविष्यकालीन अपेक्षा, राज्यवित्तीय धोरण, सवयी, वित्तीय संस्थांचा विकास, राजकीय स्थैर्य इ. या सर्व मुद्यांचे थोडक्यात स्पष्टीकरण करावे.

**प्रश्न ३) टीपा लिहा. (कोणत्याही दोन)**

१) **वित्तीय धोरणाची उद्दिष्टे.**

वित्तीय धोरणाची व्याख्या लिहून थोडक्यात स्पष्टीकरण आवश्यक. उद्दिष्टे स्पष्ट करताना पुढील मुद्दे प्रत्येकी तीन-चार ओळीत स्पष्ट करावेत. बचत – गुंतवणूक – भांडवलनिर्मितीचा वेग वाढविणे, सामाजिकदृष्ट्या उपयुक्त गुंतवणूक कार्य, आर्थिक विकासासाठी प्रेरक व पुरक भूमिका, सामाजिक – प्रादेशिक असमतोल दूर करणे, आर्थिक अस्थैर्य – भाववाढ टाळणे, उत्पन्न – संपत्ती वाटपात व्यापक लोककल्याणाच्या दृष्टिकोनातून बदल घडवणे, रोजगाराच्या संधी वाढवणे इ.

२) **सार्वजनिक कर्जाचे परिणाम.**

सार्वजनिक कर्ज संकल्पनेचे थोडक्यात स्पष्टीकरण. देशांतर्गत व परकीय कर्ज हे दोन प्रकार, परिणाम स्पष्ट करताना पुढील मुद्दे स्पष्ट करणे आवश्यक, उपभोगावरील परिणाम, व्यापारी बँकांची जादा पतनिर्मिती, गुंतवणूकीवरील परिणाम, मागणीवरील परिणाम, सार्वजनिक कर्जाचा भार इ.

३) **वस्तुविनिमयातील अडचणी.**

वस्तुविनिमयाची संकल्पना थोडक्यात स्पष्ट करणे आवश्यक. अडचणी स्पष्ट करताना पुढील मुद्दे उदाहरणासह स्पष्ट करणे आवश्यक. वस्तूच्या परस्पर विनिमयाचे प्रमाण ठरविणे, गरजांच्या दुहेरी संयोगाची आवश्यकता, विलंबित देणी भागविण्याची अडचण, मूल्यसंग्रहाची अडचण इ.

४) **पैशातील आवश्यक गुणधर्म.**

पैसा जी कार्ये करतो ती कार्ये सुलभतेने करण्याच्या दृष्टीने पैशात पुढील गुणधर्म आवश्यक असतात. सर्वमान्यता, टिकाऊपणा, वाहतुकीतील सुलभता, विभाज्यता, एकजिनसीपणा, विशेषता, मुल्याची स्थिरता इ. मुद्यांचे स्पष्टीकरण आवश्यक.

**प्रश्न ४) पैशाची मागणी म्हणजे काय? पैशाच्या मागणीचे हेतू स्पष्ट करा.**

पैशाच्या मागणीची संकल्पना. सनातनपंथिय आणि आधुनिक या दोन्ही दृष्टिकोनांचे स्पष्टीकरण. आधुनिक दृष्टिकोनानुसार व्यवहार हेतू, दक्षता हेतू, सट्टेबाजीचा हेतू यांचे उदाहरणासह सविस्तर स्पष्टीकरण आवश्यक. केन्स यांनी केलेले स्पष्टीकरण लिहीणे आवश्यक.

**प्रश्न ५) सुवर्ण चलन पद्धती म्हणजे काय? सुवर्ण चलन पद्धतीच्या ऱ्हासाची कारणे सांगा.**

सुवर्ण चलन पद्धतीची व्याख्या व थोडक्यात स्पष्टीकरण. सुवर्ण परिमाणाच्या तीन प्रकारांचे थोडक्यात स्पष्टीकरण.

सुवर्ण चलन परिमाणाच्या ऱ्हासाची कारणे पुढील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करावीत. सोन्याचे विषम वाटप, सुवर्ण परिमाणाच्या नियमांचा भंग, आर्थिक राष्ट्रवादाचा उदय, आंतरराष्ट्रीय सहकार्याचा अभाव, युद्धोत्तरकालीन परिस्थिती, इंग्लंडनेच सुवर्ण परिमाणाचा त्याग केला, जागतिक महामंदी इ.

## आर्थिक विचारांचा इतिहास (ES-4)

**प्रश्न १) पुढील प्रश्नांची प्रत्येकी ८ ते १० ओळीत उत्तरे लिहा.**

१) **मार्शल यांची अर्थशास्त्राची व्याख्या सांगा.**

अर्थशास्त्र हे मानवी जीवनाच्या नेहमीच्या व्यवहाराचे शास्त्र असून एका बाजूने मनुष्याच्या वैयक्तिक आणि दुसऱ्या व अधिक महत्त्वाच्या बाजूने मानवी भौतिक कल्याणाशी व त्याच्या सामाजिक कृतीशी निगडीत असलेले शास्त्र आहे. ही व्याख्या व तिचे थोडक्यात स्पष्टीकरण.

२) **व्यापारवाद म्हणजे काय?**

त्याकाळच्या आर्थिक जीवनात राज्यकर्ते आणि व्यापारी यांनी ज्या तत्त्वांचा किंवा सिद्धान्ताचा प्रत्यक्ष व्यवहारात उपयोग केला त्यांचा एकत्रितरित्या निर्देश करण्यासाठी स्थूलमानाने व्यापारवाद ही संज्ञा वापरली जाते. ही व्याख्या व तिचे थोडक्यात स्पष्टीकरण.

३) **समाजवादाची व्याख्या सांगा.**

समाजवाद हे समाजाचे असे आर्थिक संघटन आहे की ज्यामध्ये सामान्य आर्थिक योजनेच्या दृष्टीने उत्पादनाची साधने संपूर्ण समाजाच्या मालकीची असतात आणि अशा समाजीकृत नियोजित उत्पादनाचे लाभ समान आधारावर सर्व नागरीकांना मिळतात. ही किंवा इतर कोणतीही एक व्याख्या लिहून थोडक्यात स्पष्टीकरण.

४) **विक्री खर्च म्हणजे काय?**

विक्री खर्च म्हणजे ग्राहकाने एका वस्तू ऐवजी दुसरी वस्तू घ्यावी किंवा एका विक्रेत्याऐवजी दुसऱ्या विक्रेत्याकडून खरेदी करावी यासाठी ग्राहकाचे मन वळविण्यासाठी केलेला खर्च होय. ही व्याख्या व थोडक्यात स्पष्टीकरण.

**प्रश्न २) पुढील प्रश्नांची २५ – ३० ओळीत उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)**

१) **निसर्गवादाची मूलभूत तत्त्वे सांगा.**

नैसर्गिक व्यवस्था मुख्य कल्पना. समाजाच्या हितासाठी परमेश्वराने निर्माण केलेली व्यवस्था. कायम टिकणारी व सार्वत्रिक. मानवाच्या हितासाठी सरकारी कायदे निसर्ग नियमांना अनुसरून असावेत. सामाजिक व्यवहार निसर्गनियमांनुसार. कमी त्यागातून जास्त समाधानाच्या मानवी प्रयत्नाला निसर्गाची साथ. निसर्गात मानवी जीवन सुरळीत असते म्हणून अकारण बंधने नकोत. प्रत्येकास आपले हित कळते त्यामुळे आपोआपच सर्व समाजाचे हित साध्य होते. या सर्व मुद्यांचे थोडक्यात विश्लेषण करावे.

२) **स्मिथचे श्रमविभागणी विषयक विचार सांगा.**

स्मिथची श्रमविभागणी कल्पना नवी नसली तरी, या कल्पनेला त्याने महत्त्व प्राप्त करून दिले. श्रमविभागणीचा सविस्तर विचार प्रथम स्मिथनेच केला. श्रमातून संपत्तीची निर्मिती. मात्र त्यासाठी श्रमविभागणी महत्त्वाची, श्रमविभागणीचे फायदे स्पष्ट करून टाचणी उत्पादनाचे उदाहरण आवश्यक. केवळ उपभोगासाठी नव्हे तर विनिमयासाठीही उत्पादन केवळ श्रमविभागणीमुळेच शक्य.

३) **से चा बाजारपेठेचा नियम स्पष्ट करा.**

प्रत्येक वस्तूचा पुरवठा आपली स्वतःची मागणी निर्माण करतो, से च्या नियमाचे सविस्तर स्पष्टीकरण. से च्या नियमावरून जे निष्कर्ष निघतात त्याचे थोडक्यात विश्लेषण. शेवटी या नियमाचे मूल्यमापन थोडक्यात लिहावे.

४) **समाजवादाची कार्यपद्धती स्पष्ट करा.**

समाजवादाची व्याख्या. कार्यपद्धती स्पष्ट करताना पुढील मुद्दे स्पष्ट करावेत. सत्तेचे केंद्रीकरण एका पक्षाकडे, उत्पादन साधनांवर समाजाची मालकी, केंद्रीय नियोजन, किंमत यंत्रणेला महत्त्व नसते, सामाजिक न्यायाच्या तत्त्वानुसार राष्ट्रीय उत्पन्नाचे विभाजन इ.

**प्रश्न ३) टीपा लिहा. (कोणत्याही दोन)**

१) **स्वप्नाळू समाजवाद.**

वर्ग समन्वयातून भांडवलदारांनी मानवतावादी दृष्टिकोन ठेऊन शोषणमुक्त समाज निर्माण करावा या अपेक्षेने समाजवादी समाजव्यवस्थेचे जे चित्र आदर्श समाजवाद्यांनी रंगविले त्याबाबतचे सिस्मॉंडी, सेंट सायमन, रॉबर्ट ओवेन व प्रुधॉं यांचे विचार थोडक्यात स्पष्ट करणे आवश्यक.

२) **लिस्टचा राष्ट्रवाद.**

राष्ट्रवादी विचारसरणीच्या अर्थशास्त्रज्ञांच्या गटातील एक अग्रेसर अर्थतज्ज्ञ. ॲडम स्मिथ, जे. बी. से. यांच्यावर टिका. अभिमतपंथीयांवर जी टिका त्यांनी केली त्यातूनच आर्थिक राष्ट्रवादाची संकल्पना पुढे आली. उत्तराच्या पुढील भागात लिस्टचे राष्ट्रवादी विचार स्पष्ट करावेत.

३) **गांधीजींचे आर्थिक विचार.**

भारताच्या आर्थिक विचारांच्या इतिहासात गांधीजींचे स्थान एक अर्थशास्त्रज्ञ म्हणून नाही तर धर्म, राजकारण, जीवन विषयक जे तत्त्वज्ञान त्यांनी मांडले त्यातच त्यांचे आर्थिक विचार दिसून येतात. मानवी मूल्य, अहिंसा, साधेपणा, विकेंद्रीकरण, बेकारी, सर्वोदय योजना, अन्नधान्य व लोकसंख्या, विश्वस्त कल्पना या मुद्यांचे थोडक्यात विश्लेषण करावे.

४) **डॉ. आंबेडकरांचे आर्थिक विचार.**

डॉ. आंबेडकरांनी त्यांच्या लेखनातून अनेक आर्थिक मुद्दे मांडलेले आहेत. चलनविषयक विचार, शेतीविषयक विचार, सार्वजनिक आयव्यय, इतर आर्थिक विचार या चार मुद्यांचे थोडक्यात स्पष्टीकरण करावे. स्वातंत्र्योत्तर भारताच्या विकासासाठी हे विचार मार्गदर्शक, म्हणून महत्त्व थोडक्यात लिहावे.

**प्रश्न ४) मिल यांचे विभाजनविषयक विचार स्पष्ट करा.**

विभाजनाचे नियम मानव निर्मित, म्हणून बदलता येतात. संपत्ती, उत्पादन वाटप कसे व्हावे याचा निर्णय समाजाने घ्यावयाचा असतो. रूढी-कायदा या आधारे वाटप केले जाते पण त्यात सुधारणा आवश्यक. मिलने विभाजनाबाबत आपले वेगळे विचार मांडले. उत्पादनाचे नियम निश्चित व अटळ पण वाटपाबाबत विरोधी मत मांडले. मात्र उत्पादन व वाटप यातील संबंध मिलने लक्षात घेतला नाही. याबाबत थोडक्यात स्पष्टीकरण करावे. नंतर वेतन, नफा आणि खंड या मुद्यांच्या आधारे मिल यांचे विचार सविस्तर स्पष्ट करणे आवश्यक.

**प्रश्न ५) दादाभाई नौरोजींचा आर्थिक निस्सारणाचा सिद्धान्त स्पष्ट करा.**

सिद्धान्त मांडताना निस्सारण संकल्पना, ब्रिटिशांनी भारताची आर्थिक पिळवणूक केली त्यासंबंधीचे विचार त्यांनी मांडले, त्याबाबत स्पष्टीकरण, निस्सारणाचे स्वरूप स्पष्ट करताना भारताचे शोषण करण्यासाठी ब्रिटिशांनी पुढील मार्ग वापरले त्याबाबतचे स्पष्टीकरण. गृहखर्च, युद्धखर्च, निर्यात, कर्ज व त्यावरील व्याज, विक्रीवरील नफा, अधिकाऱ्यांनी पाठविलेली संपत्ती, सेवा खर्च इ.

आर्थिक निस्सारणाचे परिणाम स्पष्ट करताना पुढील मुद्दे स्पष्ट करावेत. भारताच्या दारिद्र्यात वाढ, शेतीप्रधान अर्थव्यवस्था, उद्योगधंदे नष्ट झाले, विविध क्षेत्रावर विपरीत परिणाम, विकास प्रक्रिया ठप्प झाली, इतर परिणाम इ.

❁❁❁

# (समाजशास्त्र)
# (SOCIOLOGY)

## सामाजिक संशोधन पध्दती (SS – 3 )

**प्रश्न १. पुढील प्रश्नांची प्रत्येकी ८ ते १० ओळीत उत्तरे लिहा.**

१) **नैसर्गिक व सामाजिक शास्त्रातील साम्य लिहा.**

नैसर्गिक व सामाजिक शास्त्रांमध्ये फरक आहे, परंतु दोहोंमध्ये साम्यही आहे. तीन बाबतींमध्ये हे साम्य आहे. १) अनुभवाधिष्ठितता २) वस्तुनिष्ठतेवर भर ३) दोन्ही शास्त्रे घटनावादी आहेत.

२) **सामाजिक शास्त्रातील गृहितकृत्याची दोन स्त्रोते सांगा**.

वैयक्तिक किंवा खाजगी स्त्रोत, बाह्यस्त्रोत

३) **निदानात्मक संशोधन आराखड्याची वैशिष्ट्ये लिहा**.

ही वैशिष्ट्ये एकूण पाच आहेत. १) वैज्ञानिक पध्दतीचा वापर २) सामाजिक समस्यांना दूर करणे हे उद्दिष्ट ३) वैज्ञानिक पध्दतीने समस्येच्या कारणांचा शोध ४) समस्येवरील उपाययोजनांबाबत विचार ५) सामाजिक समस्या सोडविण्याबाबतचे मत व निष्कर्ष व्यक्त.

४) **विशिष्ट अभ्यास पध्दतीचे गुणदोष सांगा.**

**गुण** – सखोल व समग्र अध्ययन, अभ्युपगम व सामान्यीकरण शक्य, तुलनात्मक अभ्यासाची शक्यता, प्रश्नावली व अनुसूचीसाठी उपयुक्त, संशोधनातील उणीवा दूर करणे शक्य, जीवनातील प्रभावी घटकांचा अभ्यास, नमुना निवड अनावश्यक, गतिशील घटनेचा अभ्यास.

**दोष** – अयथार्थ सामान्यीकरण, व्यक्तिनिष्ठतेचा ठसा, आत्मविश्वासाचा अतिरेक, दोषपूर्ण प्रातिनिधीक घटक, अधिक खर्चिक, वैयक्तिक कागदपत्रे दोषपूर्ण असण्याची शक्यता.

**प्रश्न २. पुढील प्रश्नांची २५ ते ३० ओळीत उत्तरे लिहा (कोणतेही दोन )**

१) **सामाजिक संशोधनातील गृहितकृत्याचे महत्व स्पष्ट करा.**

गृहितकृत्य संशोधकाला इतरत्र भटकण्यापासून वाचवितात, मार्गदर्शन करतात. **महत्व** – १) गृहितकृत्य अध्ययनास निश्चीतता देते २) अध्ययन क्षेत्रास मर्यादित करण्यास सहाय्यक ३) संशोधनाची दिशा निर्धारित करते ४) उद्देशास स्पष्ट करते ५) उपयोगी तथ्यांच्या संकलनामध्ये सहाय्यक ६) तर्कसंगत निष्कर्षांमध्ये सहाय्यक ७) निष्कर्ष काढण्यास सहाय्यक ८) सिध्दांताच्या निर्मितीमध्ये योगदान.

२) **अनुसूचीच्या बाह्यस्वरुपामध्ये कोणत्या गोष्टी विचारात घ्याव्या लागतात?**

अनुसूचीच्या भौतिक स्वरुपाला बाह्य स्वरुप म्हणतात. बाह्य स्वरुप आकर्षक असावे.

बाह्य स्वरुपामध्ये पुढील गोष्टी विचारात घ्याव्या लागतात – १) कागद २) आकार ३) समास ४) उत्तरासाठी पुरेशी जागा ५) मुद्रण किंवा छपाई ६) चित्रांचा उपयोग.

३) **आदर्श मुलाखकर्त्याचे गुण लिहा.**

मुलाखत घेणाऱ्या व्यक्तीवर मुलाखतीचे यश अवलंबून. उत्तरदात्याला बोलते करुन त्याचेकडून महत्वपूर्ण माहिती काढून घेण्याचे कसब दाखविण्याबरोबरच मुलाखतकर्त्यामध्ये काही विशेष गुण असणे आवश्यक. हे गुण – अध्ययन विषयाचे विशेष ज्ञान, कौशल्य, प्रशिक्षित विनयशीलता, नि:पक्षपातीपणा, संयम आणि सावधगिरी.

४) **नमुना निवडीच्या प्रमुख पायऱ्या लिहा.**

नमुना निवड करताना विशिष्ट अशा पायऱ्यांवरुनच नमुना निवड करावी लागते. त्या पायऱ्या –

१) समग्र निश्चित करणे २) नमुन्याच्या एककाचे निर्धारण करणे ३) उद्गम सूची उपलब्ध करणे ४)नमुन्याचा आकार निश्चित करणे ५) नमुना निवडीची पध्दत ठरविणे ६) नमुना निवड

**प्रश्न ३. टीपा लिहा (कोणत्याही दोन)**

१) **वैज्ञानिक अभ्यासपध्दतीतील अवस्था.**

**अवस्था :** १) समस्या सूत्रण २) निरीक्षण ३) वर्गीकरण ४) अभ्युपगम ५) सामान्यीकरण ६) पूर्वकथन

२) **प्रश्नावलीचे गुण – दोष**

**गुण** – विस्तृत क्षेत्राचे अध्ययन, कमीत-कमी खर्च, माहिती लगेच प्राप्त होते. पुन:पुन: माहिती प्राप्त करण्याची सोय, स्वतंत्र आणि प्रामाणिक माहिती, सोयीची पध्दत, स्वयंप्रशासन.

**दोष** – फक्त सुशिक्षित लोकांसाठी उपयोगी, अपूर्ण माहिती, प्रश्नावली भरुन पाठविण्याची समस्या, भावनात्मक प्रेरणांचा अभाव, उत्तरे लिहिण्यास संशोधनकर्त्याच्या साहाय्यतेचा अभाव, सखोल अध्ययन अशक्य, सार्वभौमिक प्रश्न अशक्य, वाईट हस्ताक्षर

३) **गैरसंभाव्यता नमुना निवड पध्दती**

अर्थ. **प्रकार** – सोयीस्कर नमुना, सहेतूक नमुना , कोटा नमुना, स्वयंनिर्वाचित नमुना.

४) **चित्र सादरीकरणाचे नियम.**

आकर्षकता, प्रमाणित आकार, वास्तविक अभिव्यक्ती, भूमितीय शुध्दता, मापन, उपयुक्त शीर्षक, शब्दांचा आणि संख्यांचा कमी उपयोग, स्पष्ट विभाजन, व्यवस्थित रचना, उपयुक्त निवड.

**प्रश्न ४. दुय्यम सामग्री मिळविण्याच्या पधदती कोणत्या?**

**प्रास्ताविक** – सामाजिक संशोधनामध्ये प्राथमिक सामग्रीपेक्षा काहीसा जास्त प्रमाणात वापर दुय्यम सामग्रीचा केला जातो. **दुय्यम सामग्री दोन प्रकार** – १) वैयक्तिक कागदपत्रे – आत्मचरित्रे, रोजनिशी, पत्रे, वैयक्तिक

कागदपत्रे मिळविण्याच्या मर्यादा. २) सार्वजनिक दप्तरे, अहवाल व अन्य प्रकाशित साहित्य - शासकीय प्रकाशने, खाजगी संस्थांची प्रकाशने, वर्तमानपत्रे व नियतकालिके, चरित्रे, ऐतिहासिक कागदपत्रे, विशिष्ट वृत्त.

**प्रश्न ५. अहवाल लेखन म्हणजे काय ? अहवाल लेखनाचे उद्देश स्पष्ट करा.**

**प्रास्ताविक** - अहवाल लेखन हा संशोधन प्रकल्पातील अंतिम टप्पा होय. अभ्यासकाने अशा प्रकारचे लेखन करताना विशेष काळजी घ्यावी लागते.

**अर्थ** - प्रो. हंसराज यांचे मत. संपूर्ण संशोधन कार्याची कलाकौशल्याचा वापर करुन लिखित स्वरुपात केलेली मांडणी म्हणजेच अहवाल लेखन होय.

**उद्देश -** ज्ञानाचा प्रसार, निष्कर्षांची यथार्थता, नवीन संशोधन कार्याला चालना, धोरण व उपाय ठरविणे.

## औद्योगिक समाजशास्त्र (SS 4)

**प्रश्न १. पुढील प्रश्नांची ८ ते १० ओळीत उत्तरे लिहा.**

१) **उद्योगधंद्यातील संमिश्र अंतर्गत सामाजिक संबंध लिहा.**

असे संबंध औपचारिक नसतात व अनौपचारिकही नसतात. उदाहरणे देउन स्पष्ट करा.

२) **उद्योगधंद्यात अधिकारी तंत्राचा उदय कसा झाला ?**

कार्यक्षम, अचूक व वैज्ञानिक प्रशासनासाठी, आधुनिक उद्योगधंद्याचा व्याप प्रचंड, स्वरुप गुंतागुंतीचे वाढत्या व्यापाबरोबर अनेक समस्या निर्माण झाल्या त्या सोडविण्यासाठी उद्योगधंद्यात अधिकारी तंत्राचा उदय.

३) **कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या भूमिकेवरील ताण लिहा**.

**ताण** - कामाची पूर्वसूचना नसणे, तोच - तोचपणा, कमी वेतन, इतर समस्या

४) **घरगुती उत्पादन पध्दतीची वैशिष्टये सांगा.**

**वैशिष्टये** १) कारागीर स्वतंत्रपणे काम करीत २) उत्पादन हे कारागीराच्या घरी ३) उत्पादन मनुष्यबळावर अवलंबून ४) उत्पादनाचा हेतू मर्यादित.

**प्रश्न २. पुढील प्रश्नांची २५ ते ३० ओळीत उत्तरे लिहा. ( कोणतेही दोन )**

१) **हॉथॉर्न प्रयोगातील प्रकाश योजना प्रयोगावर टिपण तयार करा**.

एल्टन मेयो यांच्या हॉथॉर्न प्रयोगामुळे औद्योगिक समाजशास्त्राच्या अभ्यासाला चालना. या प्रयोगाच्या अंतर्गत प्रकाशयोजना प्रयोग, प्रयोगाचे उद्दिष्ट, कामगारांचे दोन गट, प्रयोगाचे निष्कर्ष.

२) **कार्यवादी संघटनेचे फायदे - तोटे लिहा.**

**फायदे -** विशेषीकरणाला भरपूर वाव, कार्यक्षमता, लवचिकता, अचूक मार्गदर्शन, सर्व उद्योगधंद्यात उपयोगी, कार्याची योग्य चिकित्सा.

**तोटे -** आदेशांची एकता ठेवणे अवघड, विशेषज्ञांकडे दुर्लक्ष, रेखा -अधिकारी व स्टाफ अधिकारी यांचे मतभेद, संघटना प्रमुख आपले " स्वत्व " हरविण्याची शक्यता. विभाग प्रमुखांचे अधिकारात संदिग्धता.

३) **मास्लो यांची गरजांची श्रेणीरचना स्पष्ट करा**.

मास्लो यांनी गरजांची निकड लक्षात घेउन गरजांची क्रमवार रचना केली. श्रेणी रचना- शारीरिक गरजा, सुरक्षितता- गरज, सामाजिक गरजा, स्वगरज

४) **कामगार संघटनांचे मार्ग कोणते** ?

काही मार्गांचा अवलंब करुन कामगार संघटनांना आपली उद्दिष्टे साध्य करुन घ्यावी लागतात. मार्ग-परस्पर सहाय्य निधी, सामूहिक करार, कायद्याचा मार्ग.

**प्रश्न ३. टीपा लिहा ( कोणत्याही दोन )**

१) **औद्योगिक समाजशास्त्राच्या अभ्यासाचे महत्व.**

औद्योगिक समाजशास्त्राचा अभ्यास करणे का महत्वाचे आहे याबाबत समाजशास्त्रज्ञांनी काही मुद्दे मांडले आहेत. ते मुद्दे मानवी ज्ञानात वाढ, वैज्ञानिक वाढ, औद्योगिक समाजाच्या समस्यांवर उपाय शोधण्यासाठी, औद्योगिक समाजाच्या स्थिरतेसाठी, व्यक्तिगत एकतेला मदत व्हावी म्हणून, कौटुंबिक एकतेला मदत होण्यासाठी,

व्यवसायांच्या संधी, समाज आणि कामगार कल्याण साधण्यासाठी, औद्योगिक नियोजनासाठी, शांतता व उत्कर्ष यासाठी.

२) **कार्यकारीच्या समस्या**.-

कार्यकारीच्या जागेसाठी अनेक पात्र इच्छुकांची स्पर्धा पण कार्यकारीला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. **समस्या** - भूमिका व व्यक्तिमत्व यांतील अंतर, अनौपचारिक संबंधांवर मर्यादा, अधिकारी तंत्रामुळे निर्माण होणारे ताण, सत्ताभ्रष्ट होण्याची भिती.

३) **संघर्षाच्या काळात कामगार संघटनांचे डावपेच**

काही अपरिहार्य परिस्थितीत मालकवर्गावर दबाव आणण्याच्या हेतूने काही विशिष्ट निग्रहात्मक किंवा अनुनयात्मक मार्गांचा कामगार संघटना अवलंब करतात. यालाच कामगार संघटनांचे डावपेच असे म्हणतात. **डावपेच** - संघटनात्मक डावपेच, बहिष्कार, मालमत्तेची नासधूस, संथ काम, संप.

४) **संपाचे प्रकार** -

संपाचे विविध प्रकार. त्या त्या परिस्थितीप्रमाणे कामगार संघटना त्यांच्या मालकांकडून कामगारांच्या मागण्या पूर्ण करुन घेण्यासाठी संपाचे विविध प्रकार अंमलात आणतात. **संपाचे प्रकार** - मान्यतेसाठी संप, चांगल्या कामाच्या परिस्थितीसाठी संप, निदर्शनात्मक संप, सहानुभूतिदर्शक संप, कार्यक्षेत्रात्मक संप, अनधिकृत संप, सार्वत्रिक संप, बैठा संप, कामास हात न लावण्याचा संप.

**प्रश्न ४. भारतातील कामगार संघटनांच्या प्रगतीतील अडथळ्यास कारणीभूत घटक स्पष्ट करा.**

**प्रस्तावना**- औद्योगिकीकरणातून निर्माण होणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी कामगार संघटना आवश्यक. भारतातील कामगार संघटना इतर देशांतील कामगार संघटनांशी तुलना करता फारच मागे आहेत.

**प्रगतीतील अडथळे**- अंतर्गत घटक- कामगारांचे अज्ञान व निरक्षरता, कामगारातील एकजुटीचा अभाव, कामगारांची स्थलांतर करण्याची घातक प्रवृत्ती, तुटपुंजे वेतन, संघटनेचे नेतृत्व कामगारातून नाही. राजकीय पक्षांचे वर्चस्व. त्यामुळे कामगारांच्या हितापेक्षा राजकीय हिसंबंधांची जपणूक, संघटनेचा कामगारांच्या जीवनाच्या सर्वांगाला स्पर्श नाही. सतत श्रम करण्याने संघटनेच्या कामात रस घेण्याची शक्ती कामगारामध्ये उरत नाही.

**बर्हिगत घटक** - मालक वर्गाचा दृष्टीकोन, कामगारांची भरती पध्दती, सरकारचा दृष्टीकोन.

**प्रश्न ५. कामगारांचा नुकसानभरपाई कायदा (१९२३) यावर टिपण तयार करा.**

**प्रस्तावना** - आधुनिक उत्पादन पध्दतीत यांत्रिकीकरण मोठ्या प्रमाणात झाले असल्याने अवजड व गुंतागुंतीच्या यंत्राने उत्पादनाला विलक्षण वेग येत चालला आहे. अवजड यंत्रांशी काम करणाऱ्या कामगारांना अनेक धोके सहन करावे लागतात. कामगारावर आकाश कोसळते. म्हणून प्रत्येक औद्योगिक देशाच्या समाजिक सुरक्षा योजनेत कामगारांच्या नुकसानभरनपाईला महत्वपूर्ण स्थान देण्यात आले आहे.

**कायद्याची व्याप्ती** - कोणते उद्योगधंदे कायद्याच्या कक्षेत, नुकसानभरपाई आयुक्तांची कामे, कायद्यातील अपुरेपणा, कायद्यातील उणीवा दूर करण्यासाठीचे प्रयत्न.

❁❁❁

# (इतिहास)
# (HISTORY)

## आधुनिक महाराष्ट्र (इ.स. १८१८ ते १९६०) (HS - 3)

टीप : **१. उत्तरामध्ये सनावळ्यांवर भर नको.**

**२. प्रस्तावना व समारोपाचे येथे केवळ मुद्दे दिलेले आहेत. त्यांचा विस्तार पुस्तकात पाहून आपण करू शकता.**

**३. प्रस्तावना व समारोप नमुन्यादाखल दिले असून उत्तरास अनुरूप वेगळी प्रस्तावना व समारोप लिहिल्यास त्याचे स्वागतच आहे.**

**प्र. १ खालील प्रश्नांची ८ ते १० वाक्यात उत्तरे लिहा.**

**१) तिसऱ्या इंग्रज मराठा युध्दाची माहिती लिहा.**

**प्रस्तावना** – इंग्रज व मराठे यांच्यात एकूण किती युध्दे झाली?

तिसरे इंग्रज-मराठा युध्द –

युध्द कोणात, कारणे – ब्रिटिशांची जाचक बंधने व पेशवा बाजीरावाच्या स्वतंत्र हालचाली

परिणाम, ब्रिटिशांची राजनीती- बाजीरावाचे राजकीय लागेबांधे तोडले, छत्रपतीला हाताशी धरून बाजीरावाला पेशवेपदावरून दूर केले, युध्द – बाजीरावाचा पराभव.

**समारोप** – परिणामी ब्रिटिशांची सत्तास्थापना.

**२ ) संयुक्त महाराष्ट्रासंदर्भातील साहित्य संमेलनांचे योगदान लिहा.**

**प्रस्तावना** – संयुक्त महाराष्ट्राची स्थापना जरी १९६० मध्ये झाली तरी स्वातंत्र्यपूर्वकाळापासून संयुक्त महाराष्ट्रासाठी चळवळ चालू होती. साहित्यिकांनीही या संदर्भात महत्त्वाची भूमिका बजावली. संयुक्त महाराष्ट्रासंदर्भातील साहित्य संमेलनांचे योगदान.

१९०८ चे संमेलन व चिं. हि. वैद्य यांची संयुक्त महाराष्ट्राची कल्पना, भाषावार प्रांतरचनेची मागणी, बेळगाव साहित्य संमेलन – गं.त्र्यं. माडखोलकरांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना, संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचे ठराव.

**समारोप** – अण्णाभाऊ साठे, आचार्य अत्रे यासारख्या साहित्यिकांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीत महत्त्वाचे योगदान दिले.

(प्रकरण क्र. ५ पृष्ठ क्र १२७ व व ११ पृष्ठ क्र.३०७ व ३०८ च्या आधारे वरील उत्तर लिहिणे अपेक्षित आहे. ओळींची मर्यादाही पाळावी.)

**३ ) डिप्रेस्ड क्लासेस मिशनची माहिती लिहा.**

**प्रस्तावना** – दलितोध्दाराच्या चळवळीमध्ये महाराष्ट्राने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

म.फुले, महर्षि शिंदे, आंबेडकर आदिंनी विविध संस्थांच्या माध्यमातून दलितोध्दाराचे काम केले.

डिप्रेस्ड क्लासेस मिशन

स्थापना – १९०६ , संस्थापक वि.रा.शिंदे, उद्देश, शाखा.

**समारोप** – महत्त्व.

**४) ब्रिटिश काळात दळणवळणाच्या साधनांमध्ये कोणते बदल झाले?**

**प्रस्तावना** – ब्रिटिशपूर्व दळणवळणाची स्थिती.

बदल : रस्ते, रेल्वे, मोटारी, विमाने, नौकानयन इ.

(या सुधारणांचा तपशील अपेक्षित नाही.)

**समारोप** – दळणवळण सुधारणांचे फायदे.

**प्र. २ खालील प्रश्नांची २५ ते ३० वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतीही दोन)**

**१) भक्ती चळवळीचे सामाजिक योगदान लिहा.**

**प्रस्तावना –** भक्ती चळवळीच्या उदयाची पार्श्वभूमी.

भक्ती चळवळीचे सामाजिक योगदान

विविध जातीतील संत, विठ्ठलाची सगुण भक्ती, पंढरीची वारी, कर्मकांडांना व जातिभेदाला विरोध, आध्यात्मिक क्षेत्रातील समानता, मध्यस्थीला विरोध, द्वैतवाद, लोकभाषा मराठीचा अवलंब, एकत्व व समानतेची भावना रुजली, रामदासस्वामींचे वेगळेपण : शक्तीची उपासना, ऐक्य व क्षात्रतेजाला चालना, महाराष्ट्रधर्माचा पुरस्कार.

**समारोप –** मध्ययुगीन भक्ती चळवळीचा आधुनिक महाराष्ट्रावरील प्रभाव.

**२) लो. टिळकांनी सुरू केलेले राष्ट्रीय उत्सव आणि हाती घेतलेल्या चळवळी यांची माहिती लिहा.**

**प्रस्तावना –** लोकमान्य टिळकांचे राष्ट्रीय चळवळीतील स्थान.

राष्ट्रीय उत्सव – हेतू, गणेशोत्सव, शिवजयंतीचा उत्सव, शिवराज्याभिषेक उत्सव.

चळवळी – साराबंदीची चळवळ, वंगभंग – स्वदेशीची चळवळ, होमरूल चळवळ.

**समारोप –** राष्ट्रीय उत्सवांमुळे राष्ट्रीय चळवळ अधिक व्यापक बनली. तर विविध चळवळींमुळे कृतिशीलतेला वाव मिळून ब्रिटिश सरकारवरील दबाव वाढला.

३) **भाऊराव पाटील व अनुताई वाघ यांच्या शिक्षणविषयक कार्याचा आढावा घ्या.**

**प्रस्तावना –** सरकारी शैक्षणिक धोरणाच्या मर्यादा व लोकशिक्षणाची गरज.

भाऊराव पाटलांचे कार्य : रयत शिक्षण संस्था, कमवा व शिका योजना, श्रमदान, वसतिगृहे, विस्तार

अनुताई वाघांचे कार्य : आदिवासींसाठी शिक्षण, कुरण शाळा, या शिक्षणाचे स्वरूप .

**समारोप –** भाऊराव पाटील व अनुताई वाघ यांच्या या कार्यातून काय साध्य झाले तुम्हाला वाटते?

४) **सामाजिक परिवर्तन व साहित्य यांतील अन्योन्य संबंध सांगा.**

**प्रस्तावना –** आधुनिक काळात मराठी साहित्यामध्ये कथा, कादंबरी, काव्य, नाटके, निबंध इ. साहित्य प्रकारांमध्ये मोठ्या प्रमाणावर लेखन झाले.

सामाजिक परिवर्तन व साहित्य यांतील अन्योन्य संबंध :

साहित्याचा विषय काही वेळा थेट आजूबाजूच्या पर्यावरणातून, लेखक समाजाचा अविभाज्य भाग त्यामुळे समाजाचे साहित्यात प्रतिबिंब, लेखक समाजाचे प्रतिनिधीत्व करतो, लेखन वाचकाने वाचावे यासाठी. त्यामुळे वाचकाच्या वास्तवाशी बांधिलकी, साहित्याचा वाचकावर भावनिक व वैचारिक परिणाम.

**समारोप –** आधुनिक काळात मराठी साहित्याने मराठी समाजाच्या जडणघडणीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले. तसेच तत्कालिन घडामोडी व प्रेरणांचे पडसादही या साहित्यामध्ये उमटलेले दिसून येतात.

**प्र. ३ खालील टिपा २५ ते ३० वाक्यात लिहा. (कोणत्याही दोन)**

१) **गांधीवाद**

प्रस्तावना –गांधीयुग कधी सुरू झाले? तत्पूर्वी गांधीजींनी केलेल्या आंदोलनांचा थोडक्यात उल्लेख.

गांधीवाद –

जनआंदोलन, धर्मनिष्ठ धर्मनिरपेक्षता, स्वराज्य व सुराज्य एका नाण्याच्या दोन बाजू, राजकीय व आर्थिक विकेंद्रित व्यवस्था, नैतिकतेला महत्त्व, साधनशुचिता, सुधारणावाद, सत्य, अहिंसा, प्रेम, उपोषण, श्रमप्रतिष्ठा.

समारोप– गांधीवादी चळवळींबाबत महाराष्ट्राची प्रतिक्रिया.

२) **प्रार्थना समाज**

प्रस्तावना – आधुनिक काळात महाराष्ट्रामध्ये धर्मसुधारणेची प्रेरणा का निर्माण झाली?

प्रार्थना समाज – स्थापना, मूल्ये व विचारधारा, कार्य – धार्मिक व सामाजिक.

समारोप – प्रार्थना समाजाच्या कार्याचे तुम्हाला वाटणारे महत्त्व लिहा.

३) **राष्ट्रीय शिक्षण**

प्रस्तावना – ब्रिटिश काळात सरकारने सुरू केलेल्या पाश्चात्त्य शिक्षणाची वैशिष्ट्ये.

राष्ट्रीय शिक्षण –

कारणे : सरकारी शिक्षणाची हवी तशी प्रगती नाही, प्रेरणा जनजागृती व देशसेवा, स्वार्थत्यागाची शिक्षकांकडून अपेक्षा, अभ्यासक्रमामध्ये सामान्य ज्ञान व नैतिक शिक्षणाचा अंतर्भाव, चित्रकला, समगीत व शारीरिक शिक्षणाचा, यंत्रशास्त्र व रसायनशास्त्राचा समावेश, सरकारी शाळांपेक्षा वेगळी पाठ्यपुस्तके, संस्थांची उदाहरणे अपेक्षित.

समारोप – राष्ट्रीय शिक्षणाने काय साध्य केले?

४) **ब्रिटिश काळातील कामगार समस्या**

प्रस्तावना – ब्रिटिश काळातील औद्योगिक प्रगतीचा थोडक्यात उल्लेख. त्यातूनच कामगारांच्या समस्यांचा उदय.

कामगार समस्या –

कोकणातून मुंबईत रोजगारासाठी धाव, कमी पगार, बालकामगार व स्त्री कामगार यांना आणखीच कमी पगार, कामाचे अमर्यादित तास, सुट्ट्यांचा अभाव, स्वच्छतागृहे व इतर सुविधांचा अभाव, जेवणाची सुट्टी नाही, दंडात्मक कारवाया, संरक्षणाचा अभाव, परकीय व्यवस्थापक, जॉबर्सचे अत्याचार.

समारोप – महाराष्ट्रात कामगार चळवळीची सुरूवात कोणी व कधी केली?

**प्र. ४ स्त्रीविषयक सुधारणांसाठी महाराष्ट्रातील पुरुष सुधारकांनी कोणते प्रयत्न केले?**

प्रस्तावना - ब्रिटिशपूर्व काळातील स्त्रियांच्या समस्या (थोडक्यात)

पुरुष सुधारकांचे स्त्रीविषयक सुधारणांसाठी प्रयत्न - जगन्नाथ शंकरशेठ, बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी, विष्णुशास्त्री पंडित, भांडारकर, न्या. रानडे, जोतिबा फुले, धोंडो केशव कर्वे, विठ्ठल रामजी शिंदे इ. चे प्रयत्न.

समारोप - पुरुष सुधारकांच्या प्रयत्नांची मर्यादा व त्यातून स्त्री सुधारकांनी उभारलेल्या चळवळीचे वेगळेपण.

**प्र.५ महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर चळवळीची माहिती सांगून तिचे मूल्यमापन करा.**

प्रस्तावना - या चळवळीचे ढोबळ स्वरूप.

ब्राह्मणेतर चळवळ -

म. फुले, छ. शाहूमहाराजांचे कार्य - वेदोक्त प्रकरण, क्षात्र जगद्गुरू पदाची निर्मिती, स्वतंत्र प्रवाह, ब्राह्मणांबाबत अनुदार धोरण व ब्राह्मणांवरील अत्याचार, दलितांच्या हितसंबंधांकडे दुर्लक्ष, सुरुवातीच्या नेत्याची राजकीय अनास्था, विठ्ठल रामजी शिंदेंची राजकीय भूमिका, मराठा राष्ट्रीय संघाची स्थापना, चेम्सफोर्ड सुधारणा व मराठ्यांना स्वतंत्र मतदार संघ, जेधे-जवळकरांचे नेतृत्व व राजकीय भूमिका, लो. टिळक व ब्राह्मणेतर चळवळ, संघर्ष, ब्राह्मणेतरांमधील अंतर्गत संघर्ष, म. गांधी व केशवराव जेधेंची ब्राह्मणेतर चळवळीवरील टिका.

समारोप - ब्राम्हणेतर चळवळीच्या मर्यादांमुळे स्वतंत्र दलित चळवळीची उभारणी.

## चीन आणि जपानचा इतिहास (इ.स. १८३९ ते १९६०) (HS - 4)

**टीप :**

**१. उत्तरामध्ये सनावळ्यांवर भर नको.**

**२. प्रस्तावना व समारोपाचे येथे केवळ मुद्दे दिलेले आहेत. त्यांचा विस्तार पुस्तकात पाहून आपण करू शकता.**

**३. प्रस्तावना व समारोप नमुन्यादाखल दिले असून उत्तरास अनुरूप वेगळी प्रस्तावना व समारोप लिहिल्यास त्याचे स्वागतच आहे.**

**प्र. १ खालील प्रश्नांची ८ ते १० वाक्यात उत्तरे लिहा.**

**१) बॉक्सर तहाचे वर्णन करा.**

प्रस्तावना - बॉक्सर उठाव कोणी व कधी केला? उठावाचा शेवट काय झाला?

बॉक्सर तह -

उठावास पाठिंबा देणाऱ्या अधिकाऱ्यांना शिक्षा, खंडणी, शस्त्रास्त्र आयातीवर बंदी, बळी पडलेल्यांची स्मारके.

समारोप - परिणामी प्रजासत्ताकवादाला उत्तेजन.

**२) चिनी गणराज्यापुढे कोणत्या समस्या होत्या?**

प्रस्तावना - चिनी गणराज्याची स्थापना कोणी व कधी केली?

चिनी गणराज्यासमोरील समस्या -

भ्रष्टाचार, अर्थव्यवस्था डबघाईला, मालमत्तेची हानी, शासनयंत्रणा खिळखिळी इ.

समारोप- या समस्यांवर माओने कोणते उपाय योजले? (एक ते दोन वाक्यात लिहा.)

**३) कानागावा कराराची माहिती द्या.**

प्रस्तावना - कानागावा कराराची पाश्‍र्वभूमी - कमोडोर पेरीचे आगमन.

कानागावा करार - कानागावा करार कधी व कोणात झाला?

कानागावा कराराच्या तरतुदी - अमेरिका व जपान दरम्यान शांततेचे संबंध, २ जपानी बंदरे अमेरिकेस खुली, फुटलेल्या जहाजातील अमेरिकनांना चागली वागणूक, व्यापारी संबंध, अमेरिकन प्रतिनिधी.

समारोप - महत्त्व.

**४) मुक्डेन प्रकरण काय होते?**

प्रस्तावना - जपानचे मांचुरियातील हितसंबंध (दोन वाक्यात)

मुक्डेन प्रकरण -

नाकमुराची हत्या, जपानमधील वाढता लष्करवाद, मांचुरियातील जपानी लष्कराची आक्रमक भूमिका, मुक्डेनवर ताबा, आजूबाजूच्या शहरांवर ताबा.

समारोप – मुक्डेन प्रकरणाचा परिपाक – दक्षिण मांचुरियावर ताबा.

**प्र. २ खालील प्रश्नांची २५ ते ३० वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतीही दोन)**

**१) तायपिंगांनी कोणत्या सुधारणा घडवून आणल्या?**

प्रस्तावना – तायपिंग बंडाचा काळ, कारणे व नेतृत्व (चार ते पाच वाक्यात)

तायपिंगांनी केलेल्या सुधारणा –

न्याय व समतेच्या आधारे जमिनीचे फेरवाटप, स्त्रीविषयक सुधारणा, सुधारणांचे महत्त्व व मूल्यमापन.

समारोप – तायपिंग बंडाचा शेवट.

**२) चीनमध्ये साम्यवादी (कम्युनिस्ट) पक्षाचा उदय व विकास कसा झाला?**

प्रस्तावना – १९११ ची क्रांती व तिचे अपयश.

साम्यवादी पक्षाचा उदय व विकास –

कारणे व पाश्र्वभूमी – मे १९१९ ची क्रांतीचे योगदान, पहिले महायुध्द व पाश्चात्त्यांबद्दल चीड, रशियन क्रांतीपासून प्रेरणा.

उदय व विकास – मार्क्सिस्ट अभ्यासगटांची स्थापना, १९२१ साम्यवादी पक्षाची स्थापना.

समारोप – साम्यवादी पक्षाचा संघर्ष व सत्तास्थापना.

**३) जेन्रो कालखंडातील आर्थिक विकासाचा आढावा घ्या.**

प्रस्तावना – जेन्रो कालखंड म्हणजे काय?

जेन्रो कालखंडातील आर्थिक विकास –

चीन–जपान युध्द, रशिया–जपान युध्द व पहिले महायुध्द यांचा आर्थिक फायदा, शेतीचा विकास, रेशीम उत्पादन, कापड, कागद, कृत्रिम खते, लोखंड, पोलाद इ. उद्योगांची वाढ, पायाभूत सुविधा, व्यापारवाढ, निर्यातवाढ.

समारोप – जेन्रोकालीन आर्थिक विकासातील झैबत्सुंचे योगदान

**४) त्रिपक्ष कराराची माहिती द्या.**

प्रस्तावना – जपानमधील लष्करवाद.

त्रिपक्ष करार –

त्रिपक्ष करार कोणात व कधी?, जर्मनीची भूमिका, जपानची भूमिका, करारातील अटी – जर्मनी व इटलीच्या युरोपातील प्रभावक्षेत्रास जपानची मान्यता, जपानच्या प्रभावक्षेत्रास जर्मनी व इटलीची मान्यता, आक्रमण झाल्यास परस्पर सहकार्य.

समारोप – त्रिपक्ष कराराचा परिणाम.

***(सदर उत्तरात जपान–रशिया संबंधांचे विवेचन करू नये.)***

**प्र. ३ खालील टिपा २५ ते ३० वाक्यात लिहा. (कोणत्याही दोन)**

**१) शंभर दिवसांचे सुधारणा पर्व**

प्रस्तावना –सुरुवातीच्या सुधारणांचे अपयश.

शंभर दिवसांचे सुधारणा पर्व –

राजकीय पाश्र्वभूमी, कांग यु वेई चे नेतृत्व, सुधारणा – सम्राटाचे महत्त्व वाढविले, मर्यादित राजेशाही, प्रशासनाचे आधुनिकीकरण, शैक्षणिक सुधारणा, कायदेविषयक सुधारणा, आर्थिक सुधारणा, सुधारणांचा शेवट, सुधारणांचे यशापयश, मूल्यमापन.

समारोप– शंभर दिवसांच्या सुधारणा पर्वाच्या अपयशाने १९११ च्या क्रांतीची पाश्र्वभूमी तयार केली.

**२) दीर्घ कूच**

प्रस्तावना – क्योमिंतांग–कम्युनिस्ट संबंधांचे स्वरूप.

दीर्घ कूच –

क्योमिंतांगचा ज्युई चीन राज्याला वेढा, साम्यवाद्यांची शेन्सी प्रांताकडे कूच, दीर्घ कूचचे फायदे- साम्यवादाचा प्रचार, जमिनींचे समान वाटप, अन्नधान्याचे वाटप, करात कपात, लष्करी प्रशिक्षण, लष्कर भरती, जागृतीसाठी उपक्रम, नेतृत्व व अनुयायी यांचे गुण सिध्द. तोटे - विविध संकटे, अनेकजण मृत्यूमुखी.

समारोप - दीर्घ कूचनंतरचे क्योमिंतांग-कम्युनिस्ट संबंध.

३) **मेईजी काळातील राजकीय सुधारणा**

प्रस्तावना - जपान परकियांना खुला झाल्यावर इ.स. १८६८ मध्ये मुत्सुहितो याच्या हाती जपानची सत्तासूत्रे. या सम्राटाच्या कारकिर्दीमध्ये विविध क्षेत्रांमध्ये सुधारणांचा अंगिकार.

मेईजी काळातील राजकीय सुधारणा - शोगुन पद रद्द, सरंजामशाहीचा अंत, इ.स.१८८६ मध्ये जर्मनीच्या धर्तीवर नव्या राज्यघटनेची निर्मिती. या घटनेनुसार सम्राटाला महत्त्व व त्याचे पद दैवी मानले गेले. द्विगृही राष्ट्रीय विधीमंडळाची निर्मिती, वरीष्ठ सभागृह हे उमरावांचे, कनिष्ठ सभागृह लोकप्रतिनिधींचे, या गृहांचा एकमेकास शह, सम्राटाला नकाराधिकार, मंत्रिमंडळ लोकांना नव्हे तर सम्राटाला जवाबदार, मंत्रिमंडळाचे लष्करावर नियंत्रण नव्हते.

समारोप - मेईजी काळात नव्या राज्यघटनेनुसार लोकशाहीची निर्मिती. पण खूप मर्यादा, सकृतदर्शनी सम्राटाची सत्ता सर्वोच्च पण प्रत्यक्षात सत्तासूत्रे जेन्रो या दाईम्यो व सामुराईंच्या महाजन सत्तेकडे.

४) **जपानबरोबरील शांतता तह (इ.स. १९५१)**

प्रस्तावना - पार्श्वभूमी.

शांतता तह -

मूलभूत तत्त्वांची निश्चिती, सॅन फ्रान्सिस्को परिषदेत आराखडा निश्चिती, साम्यवादी राष्ट्रांची भूमिका, शांतता तह, तरतुदी - सार्वभौमत्व, जपानने व्याप्त प्रदेश कायमचे सोडले, जपानी अर्थव्यवस्थेवरील बंधने दूर, आत्मसंरक्षणाचा हक्क मंजूर.

समारोप - शांतता तहानंतरचे जपानचे अन्य राष्ट्रांशी करार.

**प्र. ४ चीनमधील १९११ च्या क्रांतीची कारणे लिहा.**

प्रस्तावना - १९११ च्या क्रांतीचे स्वरूप.

१९११ च्या क्रांतीची कारणे -

दुबळी मांचू राजसत्ता, अन्यायी करवाढ व आर्थिक दूरवस्था, भ्रष्ट प्रशासन, पाश्चात्त्य विचारांचा प्रभाव, विविध उठाव, डॉ. सन यत-सेन यांचे नेतृत्व, युआन शि काईचे कार्य.

समारोप - मूल्यमापन.

**प्र.५ इ.स. १९१८ ते १९३२ या काळातील जपानच्या परराष्ट्र धोरणाची वॉशिंग्टन परिषदेच्या संदर्भात माहिती द्या.**

प्रस्तावना- १९१८ पूर्वीचे जपानचे आक्रमक परराष्ट्र धोरण, राजकीय पक्षांच्या हाती सत्ता, नव्या सरकारचे लष्कराचे महत्त्व कमी करण्याचे प्रयत्न.

वॉशिंग्टन परिषद -

परिषद कधी, सहभागी राष्ट्रे, हेतू व हितसंबंध

चार सत्तांचा पॅसिफिक करार - सहभागी सत्ता व स्वरूप,

पाच सत्तांचा नाविक करार - सहभागी सत्ता व स्वरूप,

नऊ सत्तांचा मुक्तद्वार धोरण करार -सहभागी सत्ता व स्वरूप,

इतर निर्णय व करार,

वॉशिंग्टन परिषदेनंतर १९३२ पर्यंतचे परराष्ट्र धोरण

समारोप - समझोत्याच्या धोरणाचे परिणाम व शेवट.

# (राज्यशास्त्र)

## भारताचे परराष्ट्र धोरण (PS - 3)

**प्रश्न १. पुढील चारही प्रश्नांची ८ ते १० ओळीत उत्तरे लिहा.**

**१) परराष्ट्र धोरणाची व्याख्या व उद्दिष्टे लिहा.**

उत्तर – परराष्ट्र धोरणाची व्याख्या – प्रा. चार्लस् बर्टन मार्शल् आणि जॉर्ज मॉडेलस्की यांच्या व्याख्या लिहिणे.
परराष्ट्र धोरणाची उद्दिष्टे – १) राष्ट्राच्या सुरक्षिततेची व्यवस्था लावणे. २) राष्ट्राची राष्ट्रीय एकात्मता टिकविणे. ३) राष्ट्राचा आर्थिक विकास घडवून आणणे. ४) जागतिक व्यवस्था टिकविणे. ५) जागतिक शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करणे.

**२) दहशतवादाची व्याख्या व कारणे सांगा.**

दहशतवादाची व्याख्या – जॉन क्रेटम आणि अमेरिकेच्या संघराज्यीय गुन्हा अन्वेषण विभाग इत्यादींच्या व्याख्या लिहिणे.

दहशतवादाची कारणे – १) वैफल्य आणि आर्थिक सामाजिक दुरावस्था. २) मार्क्सवादी व इस्लामिक अरब यांच्याशी घनिष्ट संबंध. ३) एखादे ध्येय, दावा, उद्दिष्ट, समस्या यांना मान्यता मिळवून देणे.
वरीलप्रमाणे दहशतवादाची कारणे स्पष्ट करणे.

**३) 'व्यापार आणि जकातीसंबंधीचा सर्वसाधारण करार' यावर टिप लिहा.**

व्यापारात सहकार्य वाढावे यासाठी जे प्रयत्न झाले; त्यातूनच गॅट करार अस्तित्वात आला. गॅटचे मुख्य कार्यालय जिनेव्हा येथे आहे. गॅटच्या स्थापनेच्या वेळी २३ सभासद राष्ट्रे सदस्य होती. १९९५ पर्यंत गॅटची सदस्य संख्या ८१ पर्यंत वाढली आहे. गॅटची तत्त्वे आणि उद्दिष्टे इत्यादीविषयी देखील माहिती लिहिणे अपेक्षित आहे.

**४) भारत आणि बांग्लादेश यातील प्रमुख समस्यांची चर्चा करा.**

१) सीमारेषा अधोरेखित करण्याचा प्रश्न २) फराक्का धरणाचा आणि नदीपाणीवाटपाचा प्रश्न ३) निर्वासितांचा प्रश्न ४) न्यू मूर बेटाच्या मालकी हक्कावरून निर्माण झालेला वाद इत्यादी समस्या लिहिणे अपेक्षित आहे.

**प्रश्न २. पुढील प्रश्नांची २५ ते ३० ओळीत उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)**

**१) भारत आणि रशिया संबंधांची चर्चा करा.**

प्रस्तावना – भौगोलिकदृष्ट्या भारत व रशिया ही जवळजवळ असलेली राष्ट्रे आहेत. १९७१ च्या दरम्यान भारत – रशिया यांच्यात मैत्री करार झाला.

भारत – रशिया संबंध – १९४७ पासून भारत – रशिया संबंध मैत्रीचे, १९६५ च्या भारत – पाक युद्धात रशियाने ताश्कंद करारात भारताच्या बाजूने भूमिका निभावली नव्हती. मात्र, विविध प्रश्नांवरून भारताला रशियाचे सहकार्य मिळाले. १९७१ मध्ये भारत – रशिया यांच्यात शांतता मैत्री सहकार्य असा करारही झाला. १९९१ मध्ये झालेल्या रशियाच्या विघटनानंतरही भारत – रशिया यांच्या संबंधात अडथळा निर्माण झाला नाही. थोडक्यात, या प्रश्नाचे उत्तर लिहिताना – १) भारत आणि रशिया संबंध सुधारण्यास कारणीभूत झालेल्या घटना २) आंतरराष्ट्रीय प्रश्नाबाबत भारत व रशिया यांच्यातील सहकार्य ३) भारत व रशिया मैत्री करार ४) भारत व रशिया यांच्यातील विविध क्षेत्रातील सहकार्य इत्यादी घटकांचे थोडक्यात विश्लेषण लिहिणे अपेक्षित आहे.

समारोप – वरील माहितीच्या आधारे सारांश रूपाने समारोप लिहावा.

**२) भारत – पाकिस्तान संबंध स्पष्ट करा.**

**प्रस्तावना** – १४ ऑगस्ट १९४७ रोजी पाकिस्तान हे स्वतंत्र राष्ट्र अस्तित्वात आले. भारतभूमीच्या विभाजनातूनच पाकिस्तानची निर्मिती झाली असल्यामुळे ही पार्श्वभूमी दोन्ही राष्ट्रांच्या परस्पर संबंधांवर सातत्याने राहिली आहे.

भारत – पाकिस्तान संबंध –

१) भारत – पाकिस्तान संबंधांवर परिणाम घडवणारे घटक

२) काश्मीरचा प्रश्न

३) १९६५ चे युद्ध

४) ताश्कंद करार

५) १९७१ चे भारत – पाक युद्ध व बांगलादेशची निर्मिती

६) १९७२ ते १९९० मधील भारत – पाक संबंध

७) १९९० नंतर भारत – पाकिस्तान संबंध

इत्यादी वरील सर्व मुद्यांची चर्चा अगदी थोडक्यात स्पष्ट करणे अपेक्षित आहे.

**समारोप** – भारत – पाकिस्तान संबंधात नेहमी ताण–तणाव राहिलेले दिसून येतात. याची कारणे म्हणजे काश्मीरचा प्रश्न, दहशतवाद आणि पाश्चिमात्य राष्ट्रांचे भारतीय उपखंडातील हस्तक्षेप इ. आहेत. परंतु दक्षिण अशियात शांतता, सुव्यवस्था आणि हितसंबंध जोपासण्यासाठी दोघांच्याही सहकार्याची अपेक्षा आहे.

**३) 'जागतिकीकरणाची' संकल्पना विशद करा.**

**प्रस्तावना** – प्रस्तावनेमध्ये जागतिकीकरणाची व्याख्या व अर्थ लिहिणे अपेक्षित आहे. जागतिकीकरणाची संकल्पना – जागतिकीकरणाचे स्वरूप व व्याप्ती, तत्त्वे व वैशिष्ट्ये, फायदे व तोटे इत्यादी मुद्दे थोडक्यात स्पष्ट करणे.

**समारोप** – जागतिकीकरणाचे भारतावर सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम झालेले दिसून येतात.

**४) 'भारत आणि युरोपियन संघ यांच्यातील संबंध' यावर टिपण तयार करा.**

**प्रस्तावना** – युरोपियन संघाची पार्श्वभूमी, उद्दिष्ट्ये व कार्ये याबाबत अगदी थोडक्यात माहिती लिहिणे.

भारत आणि युरोपियन संघ यांच्यातील संबंध –

१) भारत व युरोपियन संघ यांच्यातील आर्थिक व व्यापारी संबंध

२) विविध क्षेत्रातील सहकार्य

३) जागतिक शांततेसाठी केलेले प्रयत्न

४) भारताला युरोपियन संघाशी संबंध ठेवण्याची गरज

इत्यादी मुद्द्यांच्या आधारे भारत व युरोपियन संघ यांच्यातील संबंध थोडक्यात लिहिणे.

**प्रश्न ३. टिपा लिहा. (कोणतेही दोन)**

**१) भारत – चीन संबंध**

**प्रस्तावना** – भारत आणि चीन ही आशिया खंडातील परस्परांच्या सीमेला लागून असलेली प्रमुख राष्ट्रे आहेत. ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय असे अनेक प्रकारचे संबंध दोन राष्ट्रांमध्ये निर्माण झालेले आहेत.

भारत आणि चीन संबंध –

१९४९ - चीनच्या साम्यवादी क्रांतीला भारताची मान्यता.

१९५० - तिबेट प्रश्न शांततेने सुटला पाहिजे अशी भारताची भूमिका.

१९५४ - तिबेटच्या संदर्भात भारताने चीनशी करार केला. तसेच पंचशील तत्त्वांना मान्यता.

१९६२ - चीनचे भारतावर आक्रमण.

१९७४ - सिक्किमचे भारतात विलिनीकरण.

भारताचे चीनशी मैत्री करण्याचे प्रयत्न.

भारत – चीन संबंधात कटुता निर्माण करणाऱ्या घटना – तिबेटचा प्रश्न, सीमावाद इत्यादी - शीतयुद्धोत्तर काळातील भारत व चीन संबंध.

वरील मुद्दे थोडक्यात स्पष्ट करणे.

**समारोप** – वरील मुद्यांच्या आधारे सारांश रूपाने समारोप लिहावा.

**२) सार्क (SAARC)**

**प्रस्तावना** – दक्षिण आशियातील भारत, पाकिस्तान, नेपाळ, भूतान, श्रीलंका, बांगलादेश, मालदीव या सात राष्ट्रांचा समावेश होतो. या सात राष्ट्रांनी एकत्र येऊन सार्क ही संघटना स्थापन केली आहे.

सार्क (SAARC) - सार्कची मूळ संकल्पना, उद्दिष्ट्ये, मूलतत्त्वे स्पष्ट करणे.

**समारोप** – सार्कचे मूल्यमापन – यश व अपयश थोडक्यात लिहावे.

३) **भारताचे आण्विक धोरण**

**प्रस्तावना** – भारताने राष्ट्रीय सुरक्षिततेला प्राधान्य देताना १९७४ व १९९८ मध्ये अणुचाचण्या घेतल्या. त्यावेळी भारताने अणुशक्तीचा उपयोग शांततेसाठी व आर्थिक विकासासाठीच करेल असे स्पष्टपणे जाहीर केले व तेच भारताचे आजतागायतपणे आण्विक धोरण राहिले आहे.

भारताचे आण्विक धोरण – भारताचे अणुविषयक धोरण डॉ. होमी भाभा यांच्या अध्यक्षतेखाली आणि पं. नेहरू यांच्या नियंत्रणाखाली सुरू झाले. या दोघांच्या नियंत्रणाखालील भारताचे आण्विक धोरण पुढील दोन पातळ्यांवर आखले गेले.

१) अणुबॉम्बची निर्मिती न करणे, जागतिक निःशस्त्रीकरणाला संपूर्ण पाठिंबा देणे.

२) अणुशक्तीचा उपयोग शांततेसाठी व विकासासाठी करणे.

१९५६-५७ च्या दरम्यान भारताने 'अप्सरा' हा अणुप्रकल्प तयार केला. त्यावेळी सुद्धा भारताने आण्विक धोरण स्पष्ट करताना अणुशक्तीचा उपयोग शांततेसाठी व विकासासाठीच केला जाईल याचा पुनरुच्चार केला.

शास्त्रीजींच्या काळात भारताचे आण्विक धोरण वास्तव बनायला सुरुवात झाली.

इंदिरा गांधींनी १९७४ मध्ये पोखरण येथे अणुचाचणी घेतली.

राजीव गांधींनी जागतिक निःशस्त्रीकरणावर जास्त भर दिला.

थोडक्यात, भारताच्या आण्विक धोरणाचा विचार करता भारताचे अणुविषयक धोरण शांतता व विकासासाठीच असल्याचे दिसून येते. इ. मुद्दे लिहिणे आवश्यक आहे.

**समारोप** – भारताच्या आण्विक प्रणालीबाबत सारांश रूपाने थोडक्यात लिहिणे.

४) **भारत आणि संयुक्त राष्ट्र संघटना**

**प्रस्तावना** – विविध देशातील संघर्ष शांततेच्या मार्गाने सोडविण्यासाठी आणि जगात सर्वत्र शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित होण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटना (युनो) स्थापन करण्यात आली.

संयुक्त राष्ट्र संघटनेची उद्दिष्टे आणि तत्त्वे थोडक्यात लिहावीत.

भारत आणि संयुक्त राष्ट्र संघटना –

संयुक्त राष्ट्र संघटनेमध्ये भारतीयांचे योगदान आणि संयुक्त राष्ट्र संघटनेने (युनोने) केलेल्या कार्यातील भारताची भूमिका याबाबत लिहावे. तसेच भारत आणि सुरक्षा समिती याविषयी थोडक्यात लिहावे.

**समारोप** – संयुक्त राष्ट्र संघटनेचे यशापयश सारांश रूपाने थोडक्यात लिहावे.

**प्रश्न ४. 'भारत आणि अलिप्ततावादी चळवळ' यावर टिपण तयार करा.**

**प्रस्तावना** – अलिप्ततेचा अर्थ, व्याख्या, उद्दिष्टे/हेतू इत्यादीबाबत अगदी थोडक्यात लिहावे.

भारत आणि अलिप्ततावादी चळवळ –

१) भारताने अलिप्ततावादाचा स्वीकार करण्याची कारणे.

२) अलिप्ततावादी चळवळीतील भारताची भूमिका व योगदान

३) भारताच्या अलिप्ततावादाचे मूल्यमापन

इत्यादी मुद्यांच्या आधारे 'भारत आणि अलिप्ततावादी चळवळ' याबाबत लिहावे.

**समारोप** – अलिप्ततावादाचे भवितव्य सारांश रूपाने थोडक्यात लिहावे.

**प्रश्न ५. भारत – अमेरिका संबंध सविस्तर विशद करा.**

**प्रस्तावना** – भारत आणि अमेरिका ही जगातील दोन मोठी लोकशाही राष्ट्रे आहेत. आंतरराष्ट्रीय राजकारणात ही दोन्ही राष्ट्रे परस्परांचे महत्त्व ओळखून आहेत. असे. असताना देखील या दोन्ही राष्ट्रांचे परस्पर संबंध फारसे जुळलेले दिसत नाहीत. मात्र ९० च्या दशकानंतर दोन्ही राष्ट्रांच्या संबंधांमध्ये सुधारणा होण्यास अनुकूल अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

भारत – अमेरिका संबंध –

१) भारत व अमेरिका यांच्यातील शीतयुद्धकालीन संबंध

२)	शीतयुद्धोत्तर काळात तणाव निर्माण करणारे प्रश्न

३)	भारत व अमेरिका यांच्यातील परस्परविरोधी भूमिका

४)	भारत व अमेरिका यांच्यातील दहशतवादाबाबत भूमिका

५)	भारत व अमेरिका यांच्यातील अणुकरार

वरीलप्रमाणे मुद्यांचे थोडक्यात स्पष्टीकरण लिहावे.

**समारोप** – अलिकडच्या काळात दोन्ही देशांमध्ये आर्थिक, व्यापारी, वैज्ञानिक, तांत्रिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक संबंध जोपासण्यावर भद देण्यात आला आहे. २००१ च्या दहशतवादी हल्ल्यानंतर दहशतवाद निपटण्यासाठी अमेरिकेला भारतासारख्या शांतताप्रिय राष्ट्राच्या मैत्रीची आवश्यकता वाटत आहे. २००८ मध्ये भारत व अमेरिका यांच्यात जो अणुकरार झाला आहे. त्यामुळे दोन्ही देशातील संबंधांत पूर्वीपेक्षा जवळीक होत असल्याचे दिसून येत आहे.

## राजकीय समाजशास्त्र (PS - 4)

**प्रश्न १) पुढील प्रश्नांची ८ ते १० ओळीत उत्तरे लिहा.**

**१)	राजकीय वर्तनवादाचे दोष स्पष्ट करा.**

**प्रस्तावना –** १) राज्यशास्त्राकडून राजकारणाकडे २) शास्त्रीयत्वाचा अतिरेक ३) मूल्य निरपेक्षता–मूल्यविहिनता ४) स्थल–काल निरपेक्षता ५) अति तांत्रिकीकरण. **समारोप.**

**२)	राजकीय सामाजिकीकरणाची प्रक्रिया स्पष्ट करा.**

**प्रस्तावना –** ३ प्रक्रियांमधून राजकीय सामाजिकीकरण होते. १) अनुकरण २) शिक्षण ३) प्रेरणा. **समारोप.**

**३)	राजकीय संस्कृतीचे आमंड आणि व्हर्बा यांनी कसे वर्गीकरण केले आहे?**

**प्रस्तावना –** आमंड आणि व्हर्बा यांनी राजकीय संस्कृतीचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण केले आहे.

१) संकुचित राजकीय संस्कृती २) आज्ञांकित राजकीय संस्कृती ३) सहभागप्रधान राजकीय संस्कृती. **समारोप.**

**४)	भारतातील दबावगटांची चर्चा करा.**

**प्रस्तावना –** १) उद्योगसमूह २) कामगारसंघटना ३) शेतकरी संघटना ४) सुशिक्षितांच्या संघटना ५) विद्यार्थी संघटना ६) जमातवादी धार्मिक गट ७) विचारप्रणालीवर आधारित गट ८) तात्पुरत्या हितसंबंधांवर आधारित गट. **समारोप.**

**प्रश्न २) पुढील प्रश्नांची २५ ते ३० ओळीत उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)**

**१)	राजकीय संस्कृतीची व्याख्या सांगून राजकीय संस्कृतीच्या घटकांची चर्चा करा.**

**प्रस्तावना –** राजकीय संस्कृतीची व्याख्या देणे.

राजकीय संस्कृतीचे घटक – १) सामाजिक परिस्थिती २) वांशिक भिन्नता ३) भाषिक भिन्नता ४) धार्मिक भिन्नत्व ५) शिक्षण व्यवस्था ६) इतिहास ७) भौगोलिक परिस्थिती ८) आर्थिक परिस्थिती ९) मानसिक घटक. **समारोप.**

**२)	राजकीय पक्षाची व्याख्या सांगून राजकीय पक्षपद्धतीचे गुण – दोष वर्णन करा.**

**प्रस्तावना –** राजकीय पक्षाची व्याख्या देणे.

राजकीय पक्षाचे गुण – १) शांततेने सत्तापरिवर्तन २) राजकीय शिक्षण ३) प्रतिनिधिक लोकशाही ४) राष्ट्रीय एकात्मता ५) सत्तेला स्थैर्य मिळते.

राजकीय पक्षाचे दोष – १) गटबाजीला प्रोत्साहन २) समतोलवृत्तीचे लोक राजकारणापासून दूर राहतात ३) सत्ताधारी व विरोधी पक्ष परस्परविरोधी ४) निवडणुकांतून भ्रष्टाचारास प्रोत्साहन. **समारोप.**

**३)	थॉर्स्टिन वेब्लेनने राजकीय श्रेष्ठीजनांची कोणती वैशिष्ट्ये सांगितली आहेत?**

**प्रस्तावना –** थॉर्स्टिन वेब्लेनने भांडवलशाही, वेगडी व्यवस्थेतील श्रेष्ठीजनांचे अचूक वर्णन केले आहे. वैशिष्ट्ये – १) श्रीमंतीची चढाओढ २) कृत्रिम सुंदरता ३) अधिक उपभोग ४) अधिक रिकामा वेळ ५) पुराणमतवादीपणा ६) व्यक्तीची कार्यक्षमता त्याच्या पैसे मिळवण्याशी निगडीत ७) आर्थिक लाभासाठी शिक्षण ८) पैशासंबंधी विचार ९) यंत्रवत विचार १०) युद्धाला पाठिंबा. **समारोप.**

४) **राजकीय संसूचनाची संकल्पना स्पष्ट करून संसूचनाची साधने सांगा.**

**प्रस्तावना –** राजकीय संसूचनाचा अर्थ व व्याख्या.

राजकीय संसूचनाची साधने – वृत्तपत्रे, आकाशवाणी, दूरदर्शन, नाटके, चित्रपट, सभा–संमेलने, इ. **समारोप.**

**प्रश्न ३) टिपा लिहा. (२५ ते ३० ओळी) (कोणत्याही दोन)**

१) **राजकीय सामाजिकीकरणाची वैशिष्ट्ये**

**प्रस्तावना –** १) सतत घडणारी क्रिया २) विशिष्ट दृष्टिकोन व वर्तनप्रणालीची निर्मिती ३) व्यक्त आणि अव्यक्त राजकीय सामाजिकीकरण ४) अनुभवजन्य राजकीय सामाजिकीकरण ५) प्रभावाची भिन्नता. **समारोप.**

२) **राजकीय पक्षपद्धतीचे प्रकार**

**प्रस्तावना –** १) द्विपक्ष पद्धती – अर्थ, गुणदोष

२) अनेकपक्ष पद्धती – अर्थ, गुणदोष

३) एकपक्ष पद्धती – अर्थ, गुणदोष. **समारोप.**

३) **भारतातील राजकीय विकासाचे घटक व अडथळे**

**प्रस्तावना –** राजकीय विकासाचे घटक – १) राजकीय संरचना २) राजकीय पक्ष ३) सरकार ४) प्रशासन ५) स्वयंसेवी संस्था ६) पंचायतराज्य व्यवस्था ७) विविध चळवळी – सहकारी चळवळ, स्त्रीमुक्ती चळवळ, दलित चळवळ, इ.

भारतातील राजकीय विकासातील अडथळे – १) दशहतवाद २) दारिद्र्य, बेकारी विषमता ३) भ्रष्टाचार ४) प्रादेशिकवाद ५) धार्मिक वाद ६) जातिवाद. **समारोप.**

४) **प्रादेशिक प्रतिनिधित्व पद्धती**

**प्रस्तावना –** प्रादेशिक प्रतिनिधित्वाचा अर्थ

**गुण** – १) प्रत्येक मतदार संघातून एक प्रतिनिधी कायदेमंडळावर पाठवला जातो. २) सोयीस्कर व सुटसुटीत पद्धत ३) मतदार व प्रतिनिधी यांच्यात जवळीक व संपर्क.

**दोष** – १) निवडीस मर्यादित वाव २) खरोखरी तज्ज्ञ व्यक्तींच्या सेवा व ज्ञानाचा उपयोग नाही ३) प्रादेशिक, जातीय व हितसंबंधी गटांना उत्तेजन ४) अल्पसंख्याकांचे शासन. **समारोप.**

**प्रश्न ४) राजकीय सामाजिकीकरणाचा अर्थ स्पष्ट करून राजकीय सामाजिकीकरणाच्या साधनांची चर्चा करा.**

**प्रस्तावना –** राजकीय सामाजिकीकरणाचे स्वरूप, अर्थ व व्याख्या –

राजकीय सामाजिकीकरणाची व्याख्या –

राजकीय सामाजिकीकरणाची साधने – १) कुटुंब व्यवस्था २) शिक्षण संस्था ३) राजकीय पक्ष ४) कार्यक्षेत्र ५) प्रसारमाध्यमे ६) दबावगट ७) सांस्कृतिक संस्था–संघटना ८) राजकीय व्यवस्थेशी संबंध. **समारोप.**

**प्रश्न ५) दबावगट म्हणजे काय? दबावगटांचे वर्गीकरण करून दबावगटांची तंत्रे सांगा.**

**प्रस्तावना –** दबावगटांची व्याख्या

वर्गीकरण – १) अतिचार गट २) असंघटित गट ३) संस्थात्मक गट ४) संघटनात्मक गट

दबावगटांची तंत्रे –

१) चर्चा, विचारविनिमय २) शासनाला निवेदन देणे ३) मागण्यांबाबत प्रसारमाध्यमांतून चर्चा ४) न्यायालयात दाद मागणे ५) मोर्चे ६) घेराव ७) उपोषण ८) टाळेबंदी ९) संप, बंद, हरताळ १०) घातपात करणे. **समारोप.**

❁❁❁

# (भूगोल)

## <u>आर्थिक भूगोल (GS – 3)</u>

**प्रश्न १. पुढील प्रश्नांची उत्तरे ८ ते १० ओळीत लिहा.**

**१) आर्थिक भूगोलाच्या व्याख्या लिहा.**

आर्थिक भूगोल हे पृथ्वीवरील घटकांचा मानवाच्या आर्थिक क्रियांवर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास करते. तसेच चिशोलम, रॉबिनसन, अलेक्झांडर इत्यादी शास्त्रज्ञांनी केलेल्या व्याख्या लिहिणे अपेक्षित.

**२) आर्थिक विकासातील शेतीचे महत्त्व स्पष्ट करा.**

प्रत्येक क्षेत्रातील व्यवसायामध्ये आर्थिक विकासाची भूमिका, व्यवसायात गुंतलेले देश इत्यादी मुद्द्यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक.

**३) रेल्वे वाहतुकीच्या समस्या लिहा.**

खर्चिक, रेल्वेमार्ग बांधणे कठीण, दगडी कोळसा व डिझेलचा वापर जास्त, कमी अंतरासाठी खर्चिक, इत्यादी मुद्द्यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक.

**४) आंतरराष्ट्रीय व्यापाराचे तोटे लिहा.**

विकसनशील देशाची आर्थिक प्रगतीत घट, मंदीची लाट असल्यास तोटा, साधनसंपत्तीचा अतिरिक्त वापर, देश एकमेकांवर अवलंबून राहतात इत्यादी मुद्द्यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक.

**प्रश्न २. पुढील प्रश्नांची उत्तरे २५ ते ३० ओळीत लिहा. (कोणतेही दोन)**

**१) आर्थिक भूगोलाच्या अभ्यासपद्धतीचे वर्णन करा.**

**प्रस्तावना –** आर्थिक भूगोलाच्या अभ्यासपद्धतीचा विकास इ. स. १९५० नंतर झाला.

मुद्दे – वस्तू दृष्टिकोन, क्रिया – प्रक्रिया दृष्टिकोन व तात्विक दृष्टिकान इत्यादी मुद्द्यांचे सविस्तर स्पष्टीकरण करणे आवश्यक. **समारोप.**

**२) आर्थिक विकासातील उद्योगधंद्याचे महत्त्व स्पष्ट करा.**

**प्रस्तावना –** भारतीय अर्थव्यवस्था ही कृषी प्रधान आहे. उद्योगाच्या विकासामुळे भांडवलनिर्मिती होऊन त्याचा उपयोग नवीन उद्योगांच्या निर्मितीसाठी होतो.

**मुद्दे –** उत्पन्नातील दरी कमी करणे, बेकारीचे प्रमाण कमी होणे, उत्पादनात वाढ, शेतीक्षेत्राचा विकास, स्वावलंबन, बचत नैसर्गिक साधनांचा अधिकाधिक वापर, निर्यातीत वाढ, रोजगारात वाढ, मूलभूत सेवांचा विकास, औद्योगिक संस्कृतीचा विकास इत्यादी मुद्द्यांचे सविस्तर स्पष्टीकरण करणे आवश्यक. **समारोप.**

**३) वाहतुकीवर परिणाम करणारे घटक स्पष्ट करा.**

**प्रस्तावना –** प्रगत आणि परिणामकारक वाहतूक आर्थिक प्रगतीचा पाया असतो.

**मुद्दे –** भूरचना, हवामान, जंगले, वाळवंटी प्रदेश, सांस्कृतिक घटक, राजकीय घटक, लोकसंख्या, आर्थिक घटक इत्यादी मुद्द्यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक. **समारोप.**

**४) जंगलाचे आर्थिक महत्त्व स्पष्ट करा.**

**प्रस्तावना** – दैनंदिन जीवनात वनाचे महत्त्व अधिक आहे.

**मुद्दे** – अन्न, वस्त्र, निवारा, इंधन, कारखान्यासाठी कच्चा माल, औषधी वनस्पती, पर्यावरण संतुलन इत्यादी मुद्द्यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक. **समारोप.**

**प्रश्न ३ टीपा लिहा.(कोणत्याही दोन)**

**१) आर्थिक भूगोलाची व्याप्ती.**

**प्रस्तावना –** आर्थिक भूगोलाची व्याख्या लिहिणे अपेक्षित.

**मुद्दे** – मानवाचा पर्यावरणाशी असलेला संबंध, सामाजिक बदलाचा अभ्यास, वेगवेगळ्या प्रदेशातील साधनसंपत्तीचा अभ्यास, राहणीमान उंचावण्याचा प्रयत्न, आंतरराष्ट्रीय पातळीवर आर्थिक घटकांचे विश्लेषण इत्यादी मुद्द्यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक. **समारोप.**

२) **आंतरराष्ट्रीय व्यापाराचे फायदे.**

आंतरराष्ट्रीय व्यापाराची व्याख्या.

**मुद्दे –** इतर देशातील वस्तूंची देवाण घेवाण, जास्त वस्तू असल्याने निवड करता येते, नैसर्गिक, समस्येवर मात, साधन संपत्तीचा पुरेपुर वापर, दुर्मिळ साधनसंपत्तीचा उपयोग, इतर देशांशी संबंध, विचार व संस्कृती यांची देवाण घेवाण इत्यादी मुद्द्यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक. **समारोप**.

३) **उर्जासाधनांचे महत्त्व**

**प्रस्तावना** – कारखानदारीच्या प्रगतीत मनुष्यबळाऐवजी उर्जा ही मध्यवर्ती घटक आहे.

**मुद्दे –** आर्थिक उत्पादनात उर्जेची गरज, वाहतूक, उष्णता व औद्योगिक प्रक्रियासाठी उर्जा आवश्यक, आधुनिक काळात उर्जा संपत्तीचे महत्त्व, दगडी कोळसा, खनिज तेल, नैसर्गिक वायुची कमतरता, पारंपारिक संशोधनाची आवश्यकता इत्यादी मुद्द्यांचे सविस्तर स्पष्टीकरण करणे आवश्यक. **समारोप.**

४) **व्यापाराचे प्रकार**

**प्रस्तावना** – व्यापार म्हणजे वस्तूंची देवाण घेवाण.

**मुद्दे** – अंतर्गत व्यापार – किरकोळ व्यापार, घाऊक व्यापार, आंतरराष्ट्रीय व्यापार, संतुलित व्यापार, प्रतिकूल संतुलित व्यापार, अनुकूल संतुलित व्यापार इत्यादी मुद्द्यांचे सविस्तर स्पष्टीकरण करणे आवश्यक. **समारोप.**

**प्रश्न ४. उद्योगांच्या स्थानिकीकरणावर परिणाम करणारे घटक स्पष्ट करा.**

**प्रस्तावना –** उद्योग व व्यवसाय हे आर्थिक विकासाचा पाया होय. ज्या प्रदेशात उद्योगातून फायदा अधिक होतो अशा प्रदेशात उद्योगाची उभारणी होते.

**मुद्दे** – कच्चा माल, नाशवंत कच्चा माल, वजनाने जड व आकाराने मोठा कच्चा माल, वजनात घट होणारा कच्चा माल, वजनात घट न होणारा कच्चा माल, उद्योगामध्ये तयार होणारा पक्का माल, शक्तीसाधने, मजुरपुरवठा, कुशल मजूर, अकुशल मजूर, व्यवस्थापकीय अधिकारी, भांडवल, वाहतूक, बाजारपेठ, शासकीय धोरणे, पाणीपुरवठा, हवामान, अन्य घटक इत्यादी मुद्द्यांचे उदाहरणासहित स्पष्टीकरण करणे आवश्यक. **समारोप.**

**प्रश्न ५. आर्थिक विकासात वाहतुकीचे महत्त्व स्पष्ट करा.**

**प्रस्तावना** – कारखान्यातील वस्तू निर्मितीचा आरंभ आणि शेवट वाहतुकीमूळे होतो. कोणत्याही प्रदेशाच्या आर्थिक विकासात वाहतूक महत्त्वाची असते.

**मुद्दे –** काल – उपयोगिता, स्थान – उपयोगिता, वस्तू – उपयोगिता विशेषीकरण, उद्योगधंद्याचे विकेंद्रीकरण, प्रादेशिक विकास, उद्योगधंद्याचे केंद्रीकरण, मानवीजीवन स्तर व राहणीमान, प्रादेशिक संरक्षण व राष्ट्रीय एकात्मता, अंतर्गत व आंतरराष्ट्रीय व्यापारवृद्धी इत्यादी मुद्यांचे उदाहरणासहित स्पष्टीकरण करणे आवश्यक. **समारोप.**

## राजकीय भूगोल (GS – 4)

**प्रश्न १. पुढील प्रश्नांची उत्तरे ८ ते १० ओळीत लिहा.**

१) **राजकीय भूगोलाच्या अभ्यासाचे दृष्टिकोन लिहा.**

सत्ताविषयक दृष्टिकोन, ऐतिहासिक दृष्टिकोन, आकृती विज्ञानीय दृष्टिकोन, कार्यात्मक दृष्टिकोन, वस्तुस्थितीविषयक दृष्टिकोन इत्यादी मुद्द्यांचे स्पष्टीकरण.

२) **मॅकींडरने केलेले जागतिक इतिहासाचे कालखंड लिहा.**

नदीकृत कालखंड, भू – मध्य सागरी कालखंड, वसाहतीचा कालखंड, मर्मभूमी कालखंड.

३) **सीमांचे गुणविशेष लिहा.**

सीमा प्रदेशाचे गुण सीमांमध्ये परावर्तिक, राज्यसंस्थेसाठी योग्य संकल्पना, नैसर्गिक सीमा अर्जित केल्या जातात, शत्रुस दूर ठेवता येते, सीमा रेषेने फरक दाखविता येतो. इत्यादी मुद्द्यांचे स्पष्टीकरण.

४) **राष्ट्र विकासाची वैशिष्ट्ये लिहा.**

उदरनिर्वाहाची शेती, आचारविचाराची देवाणघेवाण, नगरांची निर्मिती, वाहतुकीमध्ये वाढ, लोकजागृती इत्यादी मुद्द्यांचे स्पष्टीकरण.

**प्रश्न २ पुढील प्रश्नांची उत्तरे २५ ते ३० ओळीत लिहा. (कोणतेही दोन)**

१) **भूराजनीतीचे उद्देश उदाहरणासह स्पष्ट करा.**

**प्रस्तावना** – भूराजनीतीची व्याख्या.

मुद्दे – निवासस्थान, स्वयंपूर्णता, अखिल प्रदेश, भू – सत्ता, विरूद्ध नाविक सत्ता, सीमाप्रदेश इत्यादी मुद्द्यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक. **समारोप.**

२) **सीमा प्रदेशाचे प्रकार स्पष्ट करा.**

सीमा प्रदेशाची व्याख्या.

**मुद्दे** – भौगालिक सीमा प्रदेश, राजकीय सीमा प्रदेश, सांस्कृतिक सीमाप्रदेश, प्राकृतिक सीमाप्रदेश, आंतरराष्ट्रीय सीमा प्रदेश इत्यादी मुद्द्यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक. **समारोप.**

३) **राष्ट्राच्या सागरसत्तेविषयी माहॅनचे विचार स्पष्ट करा.**

**प्रस्तावना** – सागर हा विशाल व उत्तम महामार्ग आहे. या मार्गाने मनुष्य कोणत्याही देशात प्रवास करू शकतो.

**मुद्दे** – राज्याचे भौगालिक स्थान, राज्याची प्राकृतिक मान्यता, भूप्रदेश विस्तार, लोकसंख्या, राष्ट्रीय गुणधर्म, धोरणांची वैशिष्ट्ये इत्यादी मुद्द्यांचे सविस्तर स्पष्टीकरण करणे आवश्यक. **समारोप.**

४) **सागरी स्थानांच्या प्रकाराची सविस्तर माहिती लिहा.**

**प्रस्तावना –** सागरातील किंवा सागरी किनाऱ्यावरील स्थानास सागरी स्थान म्हणतात.

**मुद्दे** – एक सागरी स्थान, द्वि सागरी स्थान, त्रिसागरी स्थान, बहुसागरी स्थान, खंडीत स्थान इत्यादी मुद्द्यांचे. उदाहरणासहित स्पष्टीकरण करणे आवश्यक. **समारोप.**

**प्रश्न ३ टीपा लिहा (कोणतेही दोन)**

१) **भूराजनीतीच्या संकल्पना.**

**प्रस्तावना –** राजकीय भूगोलातील अनेक संकल्पनांचे शास्त्रीय परीक्षण व मांडणी रॅटझेल या जर्मन भूवैज्ञानिकाने केलेली होती.

**मुद्दे** – सजीव राज्य, विस्तृत प्रदेश, जर्मन वंशाची श्रेष्ठता, भूसत्ता विरूद्ध नाविक सत्ता इत्यादी मुद्द्यांचे सविस्तर स्पष्टीकरण करणे आवश्यक.

२) **सीमांचे वर्गीकरण.**

**प्रस्तावना** – राजकीय प्रदेशाची अंतिम मर्यादा ज्या रेषेने दाखविली जाते त्या रेषेस सीमा म्हणतात.

**मुद्दे** – नैसर्गिक सीमा, संस्कृतिक सीमा, गणितीय सीमा संयुक्त सीमा इत्यादी मुद्द्यांचे वर्गीकरण करणे आवश्यक.

३) **राष्ट्र व राज्य यातील फरक.**

**प्रस्तावना** – राष्ट्र व राज्य यांच्या व्याख्या व अर्थ

मुद्दे – राष्ट्रभावना, नियम, क्षेत्रिय घटक, सामाजिक घटक, राजकीय घटक, सांस्कृतिक घटक, निश्चित तारीख प्रतिके, वस्तुनिष्ठ कल्पना, सार्वभौमत्व, राष्ट्रीय भावना इत्यादी मुद्द्यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक. **समारोप.**

४) **सार्क व भारत**

**प्रस्तावना** – सार्क संघटनेची स्थापना १९८५ मध्ये ढाका येथे झाली.

**मुद्दे** – सार्क संघटनेची स्थापना कशी झाली, त्यातील सदस्य राष्ट्रे, सार्क संघटनेचे उद्देश, सार्क संघटनेची कामे, सार्क संघटनेतील समस्या या सर्व मुद्द्यांचे उदाहरणासहित स्पष्टीकरण करणे आवश्यक**. समारोप.**

**प्रश्न ४ राजकीय भूगोलाच्या व्याख्या लिहा व स्वरूप व व्याप्ती स्पष्ट करा.**

**प्रस्तावना –** मानवाच्या विविध प्रकारच्या राजनीतीचा व विविध राज्यपद्धतीचा स्थळ व क्षेत्र या संदर्भातील अविष्कार राजकीय भूगोलात अभ्यासला जातो. राजकीय भूगोलाची व्याख्या.

**मुद्दे** – व्याप्ती – राज्य व राष्ट्र यांचे भौगोलिक तादात्म्य, राज्याची साधनसंपत्ती, लोकसंख्येची सामाजिक सलग्नता, राज्याचे मैत्रीसंबंध, व्यापार, गतिमान शास्त्र, विकास.

स्वरूप – राजकीय एकक, पर्यावरण व समाज, राज्याचे परिवर्तनीय स्वरूप इत्यादी मुद्द्यांचे सविस्तर स्पष्टीकरण करणे आवश्यक.

**समारोप** – १९५० नंतर राज्यापेक्षा किंवा मोठ्या राजकीय एककाचा अभ्यास राजकीय भूगोलात वाढला आहे.

**प्रश्न ५ राष्ट्रनिर्मितीचे घटक स्पष्ट करा.**

**प्रस्तावना** – राष्ट्रीयत्वाची भावना ज्या घटकांमुळे दृढ होते, त्या घटकांनाच राष्ट्र निर्मितीचे घटक असे म्हणतात.

**मुद्दे** – समान भूप्रदेश, वांशिक एकता, संस्कृती, भाषा व लिपी, इतिहास, समान राजकीय आकांशा, आर्थिक हितसंबंध, एकात्म शासनसंस्था, राष्ट्रीयत्व इत्यादी मुद्द्यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक.

**समारोप** – राष्ट्रीयता धर्माशी निगडीत धर्माधिष्टित देश किंवा राष्ट्रे निर्माण झालेली आहेत.

☸☸☸